# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९८ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १८**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक
# दिशा
वर्ष दुसरे / अंक ८ / फेब्रुवारी १९९८

## संपादकीय

### बिनतारी संदेशवहनाचे संशोधक
### बोस की मार्कोनी?

जगदीशचंद्र बोस आणि मार्कोनी ही नांवे विज्ञानशाखेच्या विद्यार्थ्याला चांगली परिचित आहेत. बिनतारी संदेशवहनाचा शोध (wireless communication) श्री. मार्कोनी यांनी लावला, आणि त्याचे सर्व श्रेय आजपर्यंत श्री. मार्कोनी यांनाच दिले जात होते. १२ डिसेंबर १९०१ ला श्री. मार्कोनी यांनी इंग्लंडहून अॅटलांटिक महासागरापलीकडील व सध्या कॅनडायेथील न्यू फाऊंडलॅंड (New Foundland) येथे पहिला बिनतारी संदेश पाठवला. तिन टिंबांनी निर्देश होणारे इंग्रजी मधील 'S' हे मुळाक्षर प्रथम त्यांनी प्रक्षेपित केले. मार्कोनी यांचे वय त्या वेळी अवघे २७ वर्षांचे होते. मुख्य म्हणजे मार्कोनी यांचे शिक्षण फक्त शालेय स्तरापर्यंत झालेले होते. त्यांचा जन्म इटालीमध्ये २५ एप्रिल १८७४ ला झाला आणि २० जुलै १९३७ ला त्यांचे निधन झाले. त्यांना अनेक पारितोषिके त्यांच्या संशोधनाकरता मिळाली होती. १९०१ मध्ये प्रो. के. एफ. ब्राऊन यांच्याबरोबर त्यांना पदार्थ विज्ञानातील नोबल पारितोषिक देण्यात आले.

कॅनडा येथील 'न्यू फाऊंडलॅंड ' येथे इंग्लंडहून पाठविलेला बिनतारी संदेश नोंदवण्याकरिता मार्कोनी यांनी जो पाऱ्याचा सुसूत्रक (Mercury Coherer) १९०१ साली वापरला, त्याचा शोध आणि प्रात्यक्षिक श्री. बोस यांनी दोन वर्षे आधीच नोंदवून ठेवले होते. २७ एप्रिल १८९९ च्या लंडन येथील रॉयल सोसायटीच्या संशोधन पत्रिकेत बोस यांनी या यंत्राच्या संदर्भातील शोधनिबंध सादर केला होता. दुर्दैवाने जसे मार्कोनी यांनी बोस यांच्या संशोधनाचे श्रेय नोंदवले नाही तसेच १०० वर्षात कुठल्याही भारतीय किंवा पाश्चात्य संशोधकालाही बोस यांचे हे विशेष संशोधन निदर्शनास आणून द्यावेसे वाटले नाही. आजच्या या स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येक संशोधनाची नोंद आणि त्याचे योग्य ते श्रेय त्या त्या संशोधकास द्यावेच लागते. जगात आज कुठलेही संशोधन हे एखाद्या प्रथितयश आणि विश्वासार्ह संशोधन मासिकामध्ये शोधनिबंध लिहिल्याशिवाय मान्यता पावत नाही. एकाच वेळी अनेक देशांमध्ये एकाच विषयावर संशोधन चालू असते. परंतु जाहीररीत्या ज्या संशोधकाचा निबंध प्रथम प्रकाशित होतो त्यालाच त्याचे श्रेय दिले जाते. स्वामित्व (Patent) देतानाही या घटनाक्रमांचा विचार केला जातो. एडस् या रोगाची सुसूत्र नोंद अगदी अलीकडे म्हणजे १९८५ साली अभ्यासकांपुढे प्रथम आली. दोनतीन वर्षांतच या रोगाला कारणीभूत असणाऱ्या विषाणूंचा शोध अमेरिकेतील डॉ. गॅलो यांनी लावल्याचा दावा केला आणि तो प्रथमदर्शनी मान्यही झाला. परंतु लगेचच फ्रान्समधील शास्त्रज्ञांनी आपण हे विषाणू प्रथम शोधल्याचा दावा मांडला. अमेरिकेतील एका वृत्तपत्राने या फ्रेंच शास्त्रज्ञाची बाजू घेऊन लेख लिहायला सुरुवात केली. प्रथम या सर्वच लिखाणाकडे अतिरंजित आणि अफवेच्या स्वरूपाचे असे बघण्यात आले. अमेरिकेतील या विषयातील संशोधनसंस्थांना काहीशा

(मुखपृष्ठ २ वर)

नाखुषीनेच या संशोधनघटनांच्या क्रमाचा पुनर्विचार करण्याला मान्यता द्यावी लागली व ते काम निष्णात अभ्यासकांच्या एका गटाकडे देण्यात आले. आश्चर्य म्हणजे दोन्ही बाजू ऐकल्यावर व त्यांची सत्यता पडताळून पाहिल्यावर फ्रेंच अभ्यासकाचा दावा प्रथमदर्शनी खरा असल्याचे दिसून आले. अजून या विषयावर अंतिम निर्णय दिला गेला नसला तरी नोबेल पारितोषिक देण्याची वेळ आली तर ते पारितोषिक बहुधा ह्या दोन्हीही शास्त्रज्ञांमध्ये विभागून दिले जाईल असे दिसते. अशा प्रकारची उदाहरणे या शतकात आणखीही काही आहेत. महत्त्वाचे म्हणजे अशाप्रकारे आपला दावा मांडतांना एखाद्या शास्त्रज्ञाला किंवा देशाला कमीपणा तर वाटत नाहीच उलट असे श्रेय आपल्याला मिळण्याचा अधिकार आपल्याला आहे या भूमिकेतूनच या गोष्टी मांडल्या जातात. भारताच्या बाबतीत मात्र भारतीयांनी असा दावा करणे महापाप असल्याचे भासविण्यात येते. जणू काही भारतीय वैज्ञानिक अव्वल दर्जाचा विचार करूच शकत नाहीत. अशा वेळी एक वेळ पाश्चात्य अभ्यासकांची सहानभूती मिळते पण देशी संशोधक मात्र हा काय खुळेपणा आहे अशा भूमिकेतून या विषयाकडे बघत असतात. प्राचीन भारताबद्दल तर सोडाच पण २० व्या शतकातील भारतीय संशोधकांना सुद्धा याच न्यूनगंडाने पछाडलेले दिसते.

मार्कोनी आणि बोस यांच्या संदर्भातील नवीन उजेडात आलेली माहिती, ही दोन भिन्न संस्कृती आणि जीवनमूल्ये जोपासणाऱ्या विचारसरणींचे प्रतिनिधित्व करणारी घटना आहे. बोस यांनी आपल्या संशोधनाकडे व्यापारी दृष्टिकोनातून कधीही पाहिले नाही. आणि म्हणूनच आपल्या संशोधनाचे स्वामित्व (Patent) घ्यावे आणि त्या संशोधनावर व्यावसायिक यश मिळवावे असे त्यांना नुसतेच वाटलेच नाही तर त्यांनी ते कटाक्षाने हेतु पुरस्सर टाळले. एवढेच नाही तर आपल्या संशोधनाचा कोणीही मुक्तपणे वापर करू शकतो असेही त्यांनी सांगितले. १८९५ सालीच बोस यांनी बिनतारी संदेश ७५ फुटांपलीकडे पाठवून कलकत्ता येथील अभ्यासकांना स्तंभित केले होते. कलकत्याच्या एशियाटिक शोधपत्रिकेत मे १८९५ मध्ये त्यांनी आपला यासंबंधीचा शोधनिबंध सादर केला आणि त्याच्या प्रती इंग्लंडमधील आपले शिक्षक लॉर्ड केल्व्हीन यांना पाठवून दिल्या. बोस यांच्यानंतर या संशोधनाचा वापर ब्रिटीश नौदलाने त्यावेळी करून पाहिला. १८९७ साली बोस यांनी इंग्लंडमधील प्रसिद्ध रॉयल इन्स्टिट्यूट मध्ये भाषण दिले. त्या वेळीही आपले संशोधन गुप्त ठेऊन त्यावर स्वामित्व मिळवून धंदा न करता उलट ते कुणीही संशोधक वापरू शकतो या त्यांनी घेतलेल्या भूमिकेबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात आले होते.

बोस यांच्या संशोधनाची व्यावसायिक किमंत इंग्लंड, अमेरिकेमधील कारखानदारांना कळली होती. परदेशातील या उद्योगातील एक कारखानदार कलकत्ता येथे येऊन बोस यांना भेटले आणि त्यांनी लाखो रुपये बोस यांना देण्याची तयारी दाखवली. अर्थातच हे स्वामित्व मिळाल्यावर त्या संशोधनावर आधारित वस्तूंमधून होणारा नफा कारखानदार स्वतःकडे ठेवण्यास उत्सुक होता. व्यवहार्य दृष्टिकोनातून यामध्ये काहीच गैर नव्हते. परंतु बोस यांनी अशा प्रकारच्या व्यवहाराला साफ नकार दिला. या देशाची परंपरा आणि माझी संस्कृती तरी अशा प्रकारचा व्यवहार मला करून देऊ शकत नाही, अशा अर्थाचे उत्तर बोस यांनी दिले होते. १९०१ साली रवींद्रनाथ टागोर यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी हा सर्व प्रसंग लिहून ठेवला आहे. बोस, पी. सी. रे किंवा रामानुजम हे सर्व उच्चवर्णीय होते. आपले संशोधन किंवा विचार हे गुप्त किंवा बंदिस्त ठेवण्याला त्यांचा कडाडून विरोध होता. स्वामित्व किंवा व्यापार ही कल्पना सुद्धा त्यांना सहन होत नव्हती. समाजशास्त्र आणि इतर अनेक विषयांमध्ये मूलभूत काम करणाऱ्या २० व्या शतकातील अनेक भारतीयांना आज बोस किंवा रामानुजन यांच्या इतकी प्रसिद्धी मिळालेली नाही. यातलेही बहुतांशी संशोधक उच्चवर्णीय आहेत व कुठल्याही प्रसिद्धी किंवा पारितोषिकाची अपेक्षा न धरता त्यांनी आपल्या समाजाला मुक्तपणे आपले ज्ञान वाटले आहे. तरीही उच्चवर्णीयांनी आपले ज्ञान देताना हात आखडता घेतला किंवा विशिष्ट वर्गापुरते ते ज्ञान मर्यादित ठेवले असा धांदात खोटा प्रचार सिद्धांतवाद आणि राजकारणांच्या दावणीला बांधलेले समाजकारणी करताना आपण बघतो. मार्कोनी यांनी मात्र १८९७ साली एक व्यापारी कंपनी काढली. १९०० साली 'मार्कोनी वायरलेस टेलीग्राफ कंपनी' असे तिचे नामकरण

(मलपृष्ठ ३ वर)




वर्ष दुसरे / अंक ८ / फेब्रुवारी १९९८

**संपादक**
डॉ. विजय वा. बेडेकर

**सहसंपादक**
श्री. प्रकाश ल. वैद्य

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्यामंदिर,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

**वार्षिक देणगी**
रु. २०० / -

**मुद्रक :**
परफेक्ट प्रिण्ट्स,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय वा. बेडेकर | मुखपृष्ठ |
| २) | सुभाषित | प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ३ |
| ३) | साहित्य व भाषाशास्त्र | डॉ. वामन केशव लेले | ५ |
| ३) | भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१५) ओरिसा शैलीची देवालये (अ) | डॉ. र. पु. कुलकर्णी | २५ |
| ४) | वैद्यक, परामानसशास्त्र आणि आध्यात्मिकता | श्री. व. वि. अकोलकर | ३० |
| ५) | 'माझा मीच घडलो' - श्री. श्रीपाद करंदीकर | सौ. मैत्रेयी शेवडे | ३३ |
| ६) | 'तयांचा वेलू गेला गगनावरी' | सौ. मैत्रेयी शेवडे | ३४ |
| ७) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३६ |

# लेखक - परिचय

१. ***डॉ. विजय या. बेडेकर***

वैद्यक व्यावसायिक, अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था आणि चळवळींशी निगडित, अध्यक्ष - प्राच्यविद्या अभ्यास संस्था, भारत सहकारी बँक, सत्य शोध संस्था; अनेक परिसंवादांचे संयोजन, संशोधनपर लिखाण, *शोध अंधश्रद्धेचा* या पुस्तकाचे लेखक.

२. ***प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर***

संस्कृत आणि हिंदी भाषेचे पंडित, अनेक वर्षे संस्कृतचे अध्यापन; आणि प्राचार्य म्हणून पेंढारकर कॉलेज, डोंबिवली मधूननिवृत्त. बंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती; संस्कृत,इंग्रजी, हिंदी आणि मराठी मधून विपुल संशोधनपर लिखाण. *स्तबक* या पुस्तकाचे लेखक.

३. ***डॉ. वामन केशव लेले***

मराठीचा प्राध्यापक व विभागप्रमुख या पदावरून काशी हिन्दू विश्वविद्यालय, (वाराणशी) मधून जून १९९३ मध्ये सेवानिवृत्त. ५०हून अधिक शोधनिबंध व सुमारे ७५ लेख १४ अभ्यासपूर्ण व इतर ७ पुस्तके प्रसिद्ध . भारत सरकारचा राष्ट्रीय पुरस्कार , महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार व इतर अनेक पुरस्कारांचे मानकरी.

४. ***श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी***

अभियंता म्हणून शासकीय सेवेतून निवृत्त. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राचा विशेष अभ्यास व संशोधन. अभियांत्रिकी संशोधन पत्रिकांतून अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध. *काश्यपसंहिता* या शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. प्राचीन वास्तुशास्त्रावर हिंदी, मराठी व इंग्रजीत ग्रंथरचना.

५. ***श्री. वसंत वि. अकोलकर***

जन्म ६ जुलै १९११. पुण्यातील वाडिया महाविद्यालयात आणि पुणे विद्यापीठ येथे मानसशास्त्राचे अध्यापन. इंडियन फिलॉसॉफिकल कॉंग्रेस (१९५९) आणि अखिल भारतीय दर्शन परिषद (१९६२) : मानसशास्त्रविभागाचे अध्यक्ष. अमेरिकेतील ड्यूक विद्यापीठात परामानसशास्त्रीय प्रयोगशाळेत काम (१९६३) मराठी विश्वकोश व मराठी तत्त्वज्ञान महाकोशाचे अभ्यागत संपादक. मानसशास्त्र, परामानसशास्त्र व तर्कशास्त्र या विषयांवर विपुल लेखन. १९९२ मध्ये *परामानसशास्त्र (अतींद्रिय मानस)* हा ग्रंथ प्रकाशित.

६. ***प्रा. मोहन पाठक***

गेली २०-२२ वर्षे वि.प्र. मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सेवा, मराठी व ग्रंथपालन शास्त्राचे गेली १६ वर्षे अध्यापन. मुंबईच्या साहित्य संघातून 'साहित्य विशारद' ही पदवी प्राप्त. १९७५ पासून सातत्यानं अनेक नियतकालिकांतून विविध विषयांवर विपुल लेखन. ठाण्यातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ट संबंध.

# सुभाषित

१) दग्धं खाण्डवमर्जुनेन बलिना दिव्यैः द्रुमैः सेवितं
दग्धा वायुसुतेन रावणपुरी लङ्का पुनःस्वर्णभूः।
दग्धः पञ्चशरः पिनाकपतिना तेनाप्य युक्तं कृतं
दारिद्र्यं जनतापकारकमिदं केनापि दग्धं न हि ॥

२) दारिद्र्य शोचामि भवन्त मेवा
काम्यच्छरीरे सुहृदित्युषित्वा।
विपन्नदेहे मयि मन्दभाग्ये
ममेति चिन्ता क्व गमिष्यसि त्वम् ॥

३) त्वामुदर साधु मन्ये शाकैरपि यदसि लब्धपरितोषम्।
हतहृदय हि अधिकाधिक वाञ्छा शतदुर्भरं न पुनः ॥

४) तृष्णां चेह परित्यज्य को दरिद्रः क ईश्वरः
तस्याश्चेत्प्रसरो दत्तो दास्यं च शिरसि स्थितम् ॥

५) आशा हि लोहरज्जुभ्यः विषमा विपुला दृढा।
कालेन क्षीयते लोहं तृष्णा तु परिवर्धते ॥

६) शशी दिवसधूसरो गलितयौवना कामिनी
सरो विगतवारिजं मुखमनक्षरं स्वाकृतेः
प्रभुर्धनपरायणः सततदुर्गतः सज्जनो
नृपाङ्गणगतः खलो मनसि सप्तशल्यानि मे ॥

**डॉ. मो. दि. पराडकर**

१) संस्कृत सुभाषितकारांना जगातील कुठलाही विषय वर्ज्य नाही. पहिल्याच श्लोकात दारिद्र्याला उद्देशून सुभाषिताचा कर्ता म्हणतो ते आजही खरेच आहे. बलिना म्हणजे बलवान अर्जुनाने अगदी दिव्य अशा झाडांनी वेढलेले खाण्डववन जाळून टाकले ही गोष्ट महाभारतात प्रसिद्ध आहे. कौरवेश्वर धृतराष्ट्राने जाणून बुजून पाण्डवांना राज्य देताना दुर्धर अरण्याचा म्हणजे खाण्डववनाचा भाग निवडला होता कारण त्यात राज्य स्थापणे महाकठीण होते. परंतु बलवान अर्जुनाने श्रीकृष्णाच्या साह्याने आपल्या पराक्रमाच्या जोरावर ते सम्पूर्ण अरण्य जाळून टाकले व त्याने युधिष्ठिराच्या नेतृत्वाखाली इन्द्रप्रस्थासारखी राजधानी वसवली. वायुसुताने म्हणजे हनुमन्ताने रावणांची राजधानी सोन्याची (स्वर्णभू) लङ्काही जाळून टाकली हे रामायणाच्या वाचकांना माहीतच आहे. पञ्चशर म्हणजे मदन. अरविन्द (कमळ), अशोक, आंब्याचा मोहोर, नवमल्लिका आणि निळे कमळ ही कोमल फुले हेच ज्याचे बाण अशा मदनाचा प्रभाव सर्व जगावर असतो तोही पिनाकपति म्हणजे शंकर (पिनाक हे शंकराचे धनुष्य) याने रागाने जाळून टाकल्याची कथा कालिदासाच्या कुमारसंभवातल्या चौथ्या सर्गात आलेली आहे. मदनाला म्हणजे प्रेमदेवतेला जाळून टाकणे हे काही योग्य झाले नाही. मदनाचा हा शेवट तात्कालिकच होता, कारण पुढे मदनाच्या पत्नीला उःशापही मिळाला व तो जिवंत झाला व आजही तो प्रभावी आहे. परंतु सुभाषितकाराला जे सांगायचे आहे ते चौथ्या ओळीत आहे. अर्जुन, हनुमान व शंकर यांनी अशक्य वाटणाऱ्या गोष्टी करून दाखवल्या परंतु यापैकी एकानेही, सामान्यांना अडचणीत आणणारे दारिद्र्यच मात्र नाहीसे केले नाही ही या सूक्तिकाराची व्यथा बोलकी आहे. 'गरिबी हटाओ' या घोषणेने निवडणूक जिंकता आली किंवा येईलही, परंतु गरिबी नाहीशी करणे अद्यापि जमलेले नाही हे खरेच नव्हे का?

२) दुसऱ्या श्लोकात दारिद्र्याला उद्देशून गरीब माणूसच म्हणतो, 'बा दारिद्र्या, मला तुझ्याबद्दल वाईटच वाटते, कारण आमचा मित्र म्हणून तू आमच्या शरीरातच (यात परही आले) कायमचा राहिलास परंतु माझे शरीर दुर्दैवाने नाहीसे झाल्यावर तू कुठे जाशील हीच काळजी मला वाटत आलेली आहे. तुझे हक्काचे घर नाहीसे होणार, मग तुझे कसे होईल?' अशी विवंचना व्यक्त करणारा हा गरीब माणूस मनाने श्रीमंतच मानावा लागेल, कारण दारिद्र्यात पिचत राहूनही त्याची विनोदबुद्धी कमी झालेली दिसत नाही.

३) तिसरा श्लोकही संस्कृत सूक्ती लिहिणाऱ्यांच्या, जीवनातील अनुभवावर नेमके बोट ठेवण्यातल्या मार्मिकतेची प्रचीती आणून देणारा आहे. यात सूक्तिकाराने पोट आणि हृदय यांना उद्देशून जे म्हटले ते मोठे समर्पक आहे. पोटाला (उदर) तो म्हणतो - तू खरोखरच चांगला, कारण साध्या भाज्यांमुळेही तुला समाधान मिळते. पोट भाजीनेही भरते हे खरे आणि ते सोपे सहज साध्य होणारे. परन्तु हृदय हे मोठे

विकट, कारण त्याची तृप्ती कधी होत नाही. त्याच्या आकांक्षा (वाञ्छा) सतत वाढत राहतात आणि त्या शेकडो (शत), वस्तुतः अनंतच असतात. एक पूर्ण झाली की दुसरी, दुसरी पूर्ण केली की तिसरी उगवते. याला अन्त नाही. हृदयातल्या सर्व आकांक्षा तृप्त झालेला माणूस मिळणे कठीण आहे. पोटाची खळगी माणसाला भरता येते, परंतु मनाचे समाधान मिळणे कठीण. अंतरीच्या आशा अपुऱ्याच राहतात म्हणूनच या श्लोकात पोटाला चांगले आणि हृदयाला पापी म्हणजे सदैव अतृप्त किंवा विकट म्हटले. माणसाच्या शारीरिक गरजा जरी भागल्या तरी त्याच्या मनातल्या इच्छा पूर्ण करणे हे जवळजवळ अशक्यच. 'आकांक्षांपुढति जिथे गगन ठेंगणे', हेच माणसाचे वैशिष्ट्य, 'अधिकाधिक परि शत तृष्णांनी चिन्ता अल्प हि तृप्ति नसे.' म्हणूनच तुलनेने हा सुभाषितकार म्हणतो. 'किति वाखाणू उदरा, तुज रे भाजीनेही तृप्ति असे' हे या श्लोकाचे डॉ. भालचंद्र वेलणकर यांनी केलेले भाषांतर योग्यच आहे.

४) ही जी वाञ्छा म्हणजे आकांक्षा ही सतत वाढत राहिली की तिला हाव असे रूप प्राप्त होते. आणि ती तृष्णा जर सोडली किंबहुना सोडता आली तर मग माणसांत दरिद्री आणि ईश्वर किंवा धनिक हा भेदच राहत नाही. आणि या तृष्णेला जर वाढू दिले नाही तर मग प्रत्येक माणूसच तिचा दास होतो; यात गरीब आणि श्रीमंत असा भेदच राहत नाही. हाव नसलेला अकिञ्चन माणूसही कोणापुढे तोंड वेंगाडण्याचे मनात आणणार नाही, आणि हाव किंवा तृष्णा असेल तर धनवान व्यक्तीही याचना करील. मोठेपणा किंवा सन्मान मिळवण्यासाठी धनवान व्यक्तीही उत्सुक असतात आणि लोकांना खूश करणाऱ्या उद्योगात मग्न असतात. पैसा मिळवण्याची हाव गरिबात असते तर कीर्ती किंवा मोठेपणा मिळवण्याची तहान धनवन्तांनाही लागलेली असते. दोन्ही एका तृष्णेचीच रूपे. ती जर सोडली तर 'को दरिद्र' आणि 'को ईश्वर'

५) या श्लोकातही आशा माणसाच्या जीवनात किती महत्त्वाची आहे हे सांगितले. तीलोहरज्जु म्हणजे साखळदण्डापेक्षा टणक असते, तिची जातच वेगळी आहे. (विषम-निराळी, कठीण) कारण लोखंड कालांतराने झिजून जाते, पण आशा किंवा तृष्णा मात्र कमी होण्याऐवजी वाढत जाते. या दृष्टीने साखळदण्डापेक्षाही ती कठीण म्हणजे टणक असते हे मान्यच करावे लागेल. 'जब तक सांस है तब तक आस है', हे खरे आहे. ती जीवन व्यापून टाकणारी व कधीही नाहीशी न होणारी आहे, किंबहुना त्यामुळेच माणसाला कठीण परिस्थितीतही जगण्याची प्रेरणा देते.

६) शेवटचा श्लोक प्रख्यात संस्कृत कवी भर्तृहरीयाच्या नीतिशतकातला. त्याने जीवनात मनाला डाचणारी सात शल्ये मार्मिकपणे सांगितली. शशी म्हणजे चन्द्र दिवसा झाकाळून जातो आणि कामिनीचे यौवनरूपी पुष्प कालांतराने सुकून जाते, कोमेजते. थोडक्यात चंद्राचा प्रकाश, सुंदर स्त्रीचे यौवन गळून पडते आणि सुंदर सरोवरातील कमळेही कालांतराने नाहीशी होतात. या तीन शल्यांत सृष्टीतील सौन्दर्याला, कमनीयतेला अस्थिरतेचा शाप लागलेला असतो ही जाणीव कवीला झालेली दिसते. या पुढची चार शल्ये मानवी जीवनात अनुभवाला येणाऱ्या दारुण व्यथांची रूपे. सुन्दर आकृती असेल त्या व्यक्तीच्या मुखातून अक्षर निघू नये, म्हणजे ती व्यक्ती मूक असावी हे कटु सत्य. यापेक्षाही सामाजिक पातळीवरचे शल्य म्हणजे अधिकारावर असलेली व्यक्ती (मग तो राजा असो किंवा अनेकांचा पोशिंदा असो) केवळ धनपरायण असावी, तिच्या कोशात माणसाला महत्त्व नसावे हे जसे दुःखदायक, तसेच या जीवनात सज्जन नेहमीच अडचणीत असावा, आर्थिक चणचणीचा त्याला अनुभव यावा आणि सतत त्याची आपत्तीमुळे दुर्गती असावी ही फार मोठी उणीव. याचबरोबर स्वभावाने दुष्ट असणारे राजाच्या जवळ दिमाखात वावरताना दिसावे म्हणजे ते 'नृपाङ्गणगत' असावे यासारखे दुःख नाही. कवी भर्तृहरी हा नुसता कवी नव्हता, त्याने राज्यही केले. यामुळे त्याच्या अनुभवाचे क्षेत्र व्यापक होते. यामधूनच मानवी जीवनातल्या या उणिवांची त्याला जाणीव झाली असावी असे दिसते. या सात शल्यांमागची या राजाची वैचारिक बैठक शृङ्गारशतक, वैराग्यशतक आणि नीतिशतक या तिन्ही शतक काव्यांत प्रतीत झाल्यावाचून राहत नाही.

• • •

# साहित्य व भाषाशास्त्र

डॉ. वामन केशव लेले

*दि. २६, २७ व २९ डिसेंबर १९९७ रोजी ठाणे येथे आयोजित केलेल्या दुसऱ्या बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेच्या - अधिवेशन प्रसंगी 'साहित्य व भाषाशास्त्र' या विभागाचे अध्यक्ष डॉ. वामन केशव लेले यांचे अध्यक्षीय भाषण.*

आदरणीय विद्वज्जनहो,

प्रस्तुत भाषण लिहून काढण्यापूर्वी किमान गेल्या दहा वर्षांत विविध संशोधनसंस्थांच्या शोध पत्रिकांत व वार्षिकांत प्रकाशित झालेले शोध- निबंध, ग्रंथांवरील समीक्षात्मक अभिप्राय आणि वेगवेगळ्या विद्यापीठांनी विद्यावाचस्पती व विद्यावारिधी ह्या उच्च पदव्यांसाठी स्वीकारलेले शोध- प्रबंध हे सर्व साहित्य साक्षेपाने अभ्यासणे आवश्यक होते. परंतु अनेक कारणांमुळे मी ते कार्य करू शकलो नाही. जबाबदार अभ्यासकाने सबबी सांगू नयेत, हे मला मनोमन पटते. म्हणूनच जे अवश्य करणीय होते ते मी केले नाही, त्याबद्दल प्रांजलपणे दिलगिरी व्यक्त करतो आणि भाषणास सुरुवात करतो.

(१) प्रस्तुत विषयाचे साहित्यशास्त्र व भाषाशास्त्र असे दोन भाग आहेत. त्यांपैकी पहिल्या भागाचा परामर्श प्रथमत: घेऊ.

## (१.१) संस्कृत साहित्यशास्त्र म्हणजे 'भारतीय' साहित्यशास्त्र

संस्कृत साहित्यशास्त्र हे संस्कृत भाषेतील साहित्यापुरते मर्यादित आहे, त्याचा इतर प्राचीन व मध्ययुगीय भाषांशी संबंध नाही, असा अपसमज अनेक सुशिक्षितांच्या मनांत अजूनही आहे, असे प्रत्ययास येते. त्याचे निराकरण करून संस्कृत साहित्यशास्त्र हे 'भारतीय' म्हणजे 'राष्ट्रीय' साहित्यशास्त्र आहे हे सप्रमाण पटवून देणे आवश्यक आहे. हे उद्दिष्ट गाठण्याचे तीन मार्ग आहेत, ते असे : (१) प्राचीन साहित्यशास्त्रज्ञांनी संस्कृतेतर कोणकोणत्या भाषांना 'साहित्यिक भाषा' म्हणून आपापल्या ग्रंथांत मान्यता दिली होती, (२) प्रत्यक्षात त्या त्या भाषांतील साहित्यकृतींतील पद्ये उदाहरणादाखल उद्धृत केली होती काय आणि (३) त्या त्या भाषांत साहित्यनिर्मितीस कधी प्रारंभ झाला होता, ते समजून घेणे. ह्या तीन मुद्द्यांचाच क्रमश: विचार करू.

## (१.२) साहित्यशास्त्रज्ञांनी मान्यता दिलेल्या संस्कृतेतर भाषा

भामहाने प्राकृत व अपभ्रंश या दोन भाषांना (काव्यालंकार : १।१६२८), दण्डीने तद्भव, तत्सम, सौरसेनी, गौडी, लाटी व इतर देशांतील प्रचलित प्राकृत, तसेच आभीर (म्हणजे गवळी) व ढक्क (वाद्यवादक?) यांच्या अपभ्रंश या भाषांना (काव्यलक्षणम् : १९५७ : २३-२५), रुद्रटाने प्राकृत, मागधी, पैशाची, शूरसेनी व अपभ्रंश या असंमिश्र भाषांना आणि भाषाश्लेषाच्या विवेचनाच्या ओघात संस्कृत + प्राकृत + मागधीप्रभृती ५७ पोटप्रकारांना [(रुद्रट) काव्यालंकार :

१९२८:१३,४४) आणि केशवमिश्राने प्राकृत, पैशाची व मागधी या तीन भाषांना (अलंकारशेखर : १९२७:५) वाङ्मयीन भाषा म्हणून स्वीकृती दिली आहे. राजशेखराने (काव्यमीमांसा : १९३४ : ४७) शुद्धादी पाच प्रकारची मुक्तके 'यथासामर्थ्य, यथारुची व यथाकौतुक' कोणत्याही भाषेत रचावीत अशी मुभा कवींना दिली आहे. त्याने पुढे असाही उपदेश केला आहे की, कवींनी प्रबंधात्मक काव्येही संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश व पैशाची यांपैकी कोणत्याही भाषेत रचावीत. इतकेच नव्हे तर ज्या कवींचे दोन, तीन, चार भाषांवर समान प्रभुत्व असेल त्यांनी इच्छेला येईल त्या भाषेत मुक्तपणे काव्यरचना करावी (तत्रैव, पृ. ४८-४९). हेमचंद्राने संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश व ग्राम्यापभ्रंश या भाषांत लिहिलेल्या महाकाव्यांचे प्रत्येकी एकेक उदाहरणही उल्लेखिले आहे (काव्यानुशासन : १९३४:४०५). त्याच्या मते गद्यमय वा पद्यमय कथा संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, ग्राम्य, मागधी, शूरसेनी, पैशाची इत्यादींपैकी कोणत्याही भाषेत रचता येते. अर्थात सर्व भाषा कथेला 'माध्यम' ह्या नात्याने ग्राह्य ठरतात. (तत्रैव, पृ.४०६)

वरील तपशिलावरून हे स्पष्ट होईल की, संस्कृत काव्यशास्त्रकार संस्कृतेतर भाषांना संस्कृतच्या बरोबरीच्या भाषा मानत असत. ह्याबाबतीत ते 'काव्यवाहन' म्हणून कोणतीही भाषा वर्ज्य मानत नसत. त्यावरून त्यांच्या व्यापक, उदार व 'अखिल भारतीय' दृष्टिकोनाचा प्रत्यय येतो.

### (१.३) संस्कृतेतर भाषांतील उदाहृत पद्ये

आनंदवर्धनप्रभृतींनी आपापल्या ग्रंथांत एकूण ४९७ प्राकृत पद्ये उद्धृत केली आहेत, हे जगदीशचंद्र जैन (प्राकृत साहित्य का इतिहास : १९६१ : परिशिष्ट २, पृ. ७०३-७८४) यांनी निदर्शनास आणले आहे. भोजाने आपल्या शृंगारप्रकाशात २५१ प्राकृत उदाहरणपद्ये उद्धृत केली आहेत. (HSP : 1961:260). या विषयाचा साक्षेपी, सविस्तर व पद्धतशीर अभ्यास वा. म. कुलकर्णी (Prakrit Verses in Sanskrit Works on Poetics : Vol. I : Text : 1988, Vol. I : Translation : 1994) यांनी केला आहे. त्यावरून तर प्राचीन भारतीय काव्यशास्त्रकारांनी संस्कृतेतर भाषांतील काव्यांतील पद्ये अत्यंत कौतुकादराने उद्धृत करून त्यांचे रसग्रहण केले आहे हे स्पष्ट होते.

### (१.४) प्राकृतांत साहित्यनिर्मितीस प्रारंभ

अपभ्रंश भाषेत सहाव्या-सातव्या शतकात साहित्यनिर्मितीस सुरुवात झाली. (भासंको १ : १९६२ : २६०) आणि अधिकांश रचना गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, विदर्भ, मिथिला व मगध या प्रदेशांत झाली (तत्रैव पृ. १६३). वॉर्डर यांनी सरह, काण्ह व इतर बौद्धांनी + ८०० च्या सुमारास गंधारच्या उत्तरेकडील उड्डीयान इलाख्यात अपभ्रंशांत अनेक दोहाकोष सिद्ध केले, असे प्रतिपादिले आहे (IKL : 1983 : 443-444). वॉर्डर यांनीच असे निरीक्षण नोंदविले आहे की +१००० च्या सुमारास अपभ्रंश ही 'साहित्यिक भाषा' या स्वरूपात काश्मीरपासून कर्नाटकापर्यंत मान्यता पावली होती (Ibid, 434)

गुणाढ्याने आपली बृहत्कथा ही कादंबरी पैशाची भाषेत - १०० च्या सुमारास लिहिली असे वॉर्डर 'Classical Literature' (CHI:175:176) या निबंधात मानतात. परंतु, सातवाहनांचे राज्य

प्रस्थापित होण्यापूर्वी म्हणजे - १०० ते - २०० या कालावधीत पैशाची ही दक्षिणापथाची 'साहित्यिक भाषा' होती (IKL 2 : 1974:119). दक्षिणापथात महाराष्ट्र, माहिषक, अश्मक, विदर्भ, कुन्तल, क्रथकैशिक, सूर्पारक, कांची, केरळ, कावेर, मुरल, वानवासक, सिंहल, चोड, दण्डक, पाण्ड्य, पल्लव, गाङ्ग, नाशिक्य, कोंकण, कोल्लगिरी व वल्लार ह्या प्रदेशांचा समावेश होत असे. (काव्यमीमांसा : १९३४ : Intro. XLI)

काणे यांनी केलेल्या नोंदीनुसार -२०० पासून पुढील अनेक शतकांत उत्तर व दक्षिण भारतात खोदले गेलेले शिलालेख प्राकृत भाषेत आहेत (HSP : 1961 : 79). ह्यावरून प्राकृत भाषेची प्राचीनता लक्षात येते. हाल-संपादित गाथासप्तशतीतील तिसऱ्या पद्यात असा उल्लेख केला आहे की, हालाच्या काळापर्यंत प्राकृत भाषेत एक कोटी गाथा लिहिल्या गेल्या होत्या. यातील अतिशयोक्ती वजा केली तरी इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून प्राकृतात साहित्यनिर्मितीस सुरुवात झाली होती, असे मानणे वावगे नाही. महाराष्ट्री प्राकृतात +१०० ते २०० या काळात काव्ये लिहिली जाऊ लागली (IKL 2 : 1974:118). तिला साहित्यिक भाषा म्हणून संस्कृतच्या बरोबरीचे स्थान मिळाले. सट्टक, कादंबऱ्या, महाकाव्ये इत्यादी सर्व साहित्य-प्रकार त्या भाषेत लिहिले जाऊ लागले (तत्रैव, पृ. ११७, २१४).

भरताने नाट्यशास्त्रात शौरसेनी ही प्रमुख प्राकृत भाषा मानली आहे (HSP : 1961 : 34). +७८ पासून पुढे ही भाषा नाटकातील प्राकृत संवादांसाठी सर्रास वापरण्यात येऊ लागली (IKL 2 : 1974 : 143). शौरसेनी ही नाटकातील सर्व जातीच्या स्त्रीपात्रांची बोली होती.

वरील तपशिलावरून हे स्पष्ट होईल की, संस्कृत साहित्याने व साहित्यशास्त्राने संस्कृतेतर भारतीय भाषांनाही संस्कृताइतकाच मान दिला आहे, त्यांचा नि:संकोचपणे व आत्मीयतेने वापर केला आहे. अर्थात संस्कृत साहित्यशास्त्र हे +५६६ मध्ये नरेन्द्रयशस् नावाच्या ग्रंथकाराने 'चन्द्रगर्भसूत्र' नामक ग्रंथात निर्देशिलेल्या अंग-वंग-कलिंग प्रभृती ५६ देशांतील विविध भाषांत लिहिल्या गेलेल्या ललित साहित्याचे विश्लेषणात्मक व रसग्रहणात्मक समीक्षण करणारे शास्त्र आहे; जणू ते एका समग्र संस्कृतीच्या प्रतिभा- विलासाचे समालोचन करणारे शास्त्र आहे, हे लक्षात घ्यावयास हवे.

### (१.५) काही संस्कृतेतर साहित्यकृतींचा परिचय किंवा अनुवाद

संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी ज्या संस्कृतेतर साहित्यकृतींतील पद्ये आदराने उद्धृत केली आहेत अशांपैकी काही साहित्यकृतींचा मराठीत परिचय करून दिला गेल्यास किंवा त्या कृतींचा अनुवाद केला गेल्यास वरील विधानाची सत्यताही पटेल व त्या कृतींची वाङ्मयीन वैशिष्ट्येही समजून येतील. अशा काही निवडक कृतींची नोंद खाली करतो.

| अनुक्रम | कविनाम | कविसमय | काव्यनाम | काव्यप्रकार | भाषा |
|---|---|---|---|---|---|
| १ | आनंदवर्धन | +८५५-८३ | देवीशतक | स्तोत्र | संस्कृत+प्राकृत |
| २ | " | " | विषमबाणलीला | महाकाव्य | महाराष्ट्री प्राकृत |
| ३ | उपतिस्स | +१००० | महाबोधिवंश | आख्यायिका | पाली |
| ४ | चतुर्मुख | +८५०- | अब्धिमथन | महाकाव्य | अपभ्रंश |
| ५ | जयवल्लभ | +९०० | वज्जालग्ग | पद्यसंग्रह | महाराष्ट्री प्राकृत |
| ६ | त्रिभुवन | +९०० | पउमचरिउ उत्तरार्ध | महाकाव्य | अपभ्रंश |
| ७ | धणवाल् | सुमारे +१००० | भविसयत्तकहा | कादंबरी | " |
| ८ | धनपाल प्रथम | +९७५-९९५ | ऋषभपंचाशिका | स्तोत्र | प्राकृत |
| ९ | कुतूहल | +८०० | लीलावई | कादंबरी | पैशाची |
| १० | पुष्पदन्त | +९६७ | णायकुमारचरिउ | " | अपभ्रंश |
| ११ | " | +९५९-६५ | महापुराण | महाकाव्य | " |
| १२ | भेज्जल | +८०० | राधाविप्रलंभ | रासकांक | सैंधव भाषा |
| १३ | संघदास | +५००-७०० | वसुदेवहिण्डी | कादंबरी | जैन महाराष्ट्री |
| १४ | स्वयंभूदेव | +८००-९०० | पउमचरिउ पूर्वार्ध | महाकाव्य | अपभ्रंश |
| १५ | हरिभद्र | +७५० | समराइच्च | कादंबरी | महाराष्ट्री प्राकृत |
| १६ | राणक | +८००-९०० | डोंबिका | नृत्यनाट्य | अपभ्रंश वा सैंधव |
| १७ | शीलांक | +८६७ | चौपन्नमहापुरिस-चरिअ | कादंबरीसदृश चंपू | महाराष्ट्री प्राकृत |
| १८ | श्रीचंद्रकवी | +९४१-९९६ | कथाकोष | धार्मिक कथा | अपभ्रंश |

वर (१.१) ते (१.५) मध्ये मांडलेल्या विषयाशी संलग्न अशा विषयाकडे आता वळू.

## (२) संस्कृत साहित्यशास्त्रीय ग्रंथांची मराठी भाषांतरे

### (२.१) भाषांतरित ग्रंथांची आवश्यकता

गेल्या सुमारे शंभर वर्षांच्या कालावधीत मराठीत संस्कृत साहित्यशास्त्रावर सारांशपर, परिचयात्मक, संकलनात्मक, अनुवादस्वरूपी व समीक्षात्मक असे विविध स्वरूपाचे ग्रंथ लिहिले गेले आहेत. पण

ह्यांत महत्त्वपूर्ण मूळ संस्कृत ग्रंथांच्या मराठी भाषांतरांची संख्या अत्यल्प आहे. (ध्वन्यालोक, दशरूपक, कविकण्ठाभरण, औचित्यविचारचर्चा, काव्यप्रकाश व रसगंगाधर एवढीच ग्रंथनामे चटकन डोळ्यांसमोर येतात). बाकीचे ग्रंथ दुर्लक्षित राहिले आहेत. त्यामानाने हिंदी व इंग्रजी या भाषांत व अन्य विदेशी भाषांत बहुसंख्य ग्रंथांचे अनुवाद झाले आहेत. भामहप्रभृतींचे मूळ संस्कृत ग्रंथ अनूदित स्वरूपात मराठी अभ्यासकांना उपलब्ध झाले तर संबंधित साहित्यशास्त्रकारांनी कोणते सिद्धांत मांडले आहेत, गुणालंकारप्रभृती काव्यधर्मांचे विवेचन कसे केले आहे, आपल्या प्रमेयांच्या सिद्धीसाठी कोणते युक्तिवाद केले आहेत, ग्रंथरचनेपूर्वी किती व्यापक शास्त्रीय अध्ययन केले आहे (उदा. कविभूषण गोपीनाथपात्र +१७६३-) याने 'कविचिन्तामणी' हा साहित्यशास्त्रीय ग्रंथ लिहिण्यापूर्वी विविध शास्त्रांवरील ४४ ग्रंथांचे परिशीलन केले होते, (पहा - MSP : 1988 : 205-222), तसेच वेगवेगळ्या मुद्द्यांच्या समर्थनपूर्वक स्पष्टीकरणासाठी किती लक्ष्य ग्रंथांचा धांडोळा घेतला आहे. (उपर्युक्त गोपीनाथपात्राने ४० लक्ष्य ग्रंथांतील पद्ये उद्धृत केली आहेत - तत्रैव), ग्रंथलेखनाची चरक-कौटल्यप्रभृतींनी प्रतिपादलेली पद्धत व शिस्त किती काटेकोरपणे पाळली आहे, इत्यादी बऱ्याच बाबींवर प्रकाश पडू शकेल. जिज्ञासूंच्या ज्ञानात ह्यायोगे भर पडेल. अभ्यासकांना विविध विषयोपविषय निवडून त्यांचे स्वतंत्रपणे किंवा तौलनिक पद्धतीने अध्ययन करता येईल. विविध काव्यधर्मांचा कालानुक्रमाने विकास कसा झाला, त्या प्रक्रियेत त्या त्या काव्यधर्मांत स्थित्यंतरेरूपांतरे कशी व किती झाली, एकाच संकल्पनेचा परामर्श घेणारे निरनिराळे दृष्टिकोन कसे उदयास आले, भारतीय साहित्यशास्त्रीय संकल्पनांत व पाश्चात्यांच्या संकल्पनांत साम्यभेद कोणते, इत्यादी अनेक अभ्यासविषय उपलब्ध होऊ शकतील. शिवाय भारतीय साहित्यशास्त्रीय तत्त्वांच्या प्रकाशात मध्ययुगीय मराठी साहित्यातील महत्त्वपूर्ण कृतींचे समीक्षात्मक अध्ययन करणे सुकर होईल. ह्या सर्व बाबी लक्षात घेऊन पुढील १२ संस्कृत ग्रंथांचे यथावत अनुवाद मराठीत व्हावेत असे साग्रह सुचवावेसे वाटते.

### (२.२) भाषांतरयोग्य ग्रंथ

#### (२.२.१) भामह : काव्यालंकार : +५००...७००

**वैशिष्ट्ये :** समग्र स्वरूपात उपलब्ध असलेला प्राचीनतम ग्रंथ. पाच परिच्छेद, ४०० कारिका. वाचण्यासाठी, ऐकण्यासाठी, बघण्यासाठी, कोणत्याही भाषेत, माध्यमात वा प्रकारात लिहिलेले साहित्य म्हणजे काव्य ही व्यापक संकल्पना. रमणीय शब्द व रमणीय अर्थ यांच्यामुळे काव्यात सौंदर्य उत्पन्न होते हा मध्यवर्ती सिद्धांत. काव्याचे तर्कशास्त्र वेगळे असते. दैनंदिन भाषेहून काव्याची भाषा भिन्न असते. भाषेतील व्याकरणशुद्ध काही शब्द काव्यात प्रयोज्य असतात, तर काही अप्रयोज्य असतात. कवीची वाणी निसर्गत:च रमणीय असते. भामहाने काव्यनिर्मितीची प्रक्रिया उलगडून सांगून व प्रयोज्याप्रयोज्य शब्दांचा परामर्श घेऊन भारतीय शैलीशास्त्राची प्राणप्रतिष्ठा केली.

#### (२.२.२) दण्डी : काव्यलक्षणम् ऊर्फ काव्यादर्श : +६०६...७१०

**वैशिष्ट्ये :** तीन परिच्छेद, ६४७ कारिका. वैदर्भ व गौड हे दोन मुख्य मार्ग (=रचनाप्रकार).

अवान्तर मार्ग अनेक. श्लेषादी दहा गुण वैदर्भ मार्गाचे प्राण. काव्याचे शोभाकर धर्म म्हणजे अलंकार. ते तात्त्विक दृष्ट्या असंख्य व त्यांत सतत भरच पडत असते. ३५ अलंकार मुख्य. अनेक अलंकारांचे अनेक उपभेद. उदारहणार्थ, उपमेचे ३२, यमकाचे ६५ इत्यादी. ह्या ग्रंथाला लाभलेल्या बृहत्तरभारतीय प्रतिष्ठेबद्दल वॉर्डर म्हणतात : "Daṇḍin's Kāvyalakṣaṇa was studied from Ceylon and Burma to Tibet ... It was paraphrased in Sinhalese and Pali and translated into Tibetan and Tamil". (IKL 4:1983:209)

**(२.१.३) वामन : काव्यालंकारसूत्रवृत्ति : +८००...८५०**

**वैशिष्ट्ये :** सूत्रवृत्तिउदाहरणात्मक रचना, ५ अधिकरणे, १२ अध्याय. अलंकार म्हणजे सौंदर्य. कवींचे विवेकी व अविवेकी असे दोन प्रकार. रीती हा काव्याचा आत्मा. वैदर्भी रीती ही समग्र दहा गुणांनी युक्त. कवी शब्दांची काढघाल योग्यतम शब्द मिळेपर्यंत चालू ठेवतो. सुटे काव्य निस्तेज. दीर्घ काव्यरचनांत दशरूपक श्रेयस्कर, चित्रपटाप्रमाणे चित्तवेधक. त्याच्यापासूनच महाकाव्यादींची उत्पत्ती. दोषांचे पद, पदार्थ, वाक्य व वाक्यार्थ असे चार प्रकार. गुण सौंदर्य उत्पन्न करतात, अलंकार ते सौंदर्य वाढवतात. १० शब्दगुण व १० अर्थगुण असे एकूण गुण वीस. उपमा सर्व गुणांच्या मुळाशी असते. कवीने व्याकरणदृष्ट्या शुद्ध शब्दच वापरावेत.

**(२.२.४) रुद्रट : काव्यालङ्कार : +८२५...८५०**

**वैशिष्ट्ये :** १६ अध्याय, ७३४ श्लोक. सर्व उदाहरणे स्वरचित. वैदर्भी, पांचाली, लाटी व मागधी अशा चार रीती. प्राकृत, संस्कृत, मागधी, पैशाची, शूरसेनी व अपभ्रंश अशी सहा काव्यमाध्यमे. पाच वृत्ती. भाषाश्लेषाचे पन्नासहून अधिक प्रकार. वास्तव, औपम्य, अतिशय व श्लेष ही अर्थालंकारांच्या विभाजनाची आधारतत्त्वे. एकूण अलंकार ६८. नायकनायिकांचे प्रकार इत्यादींचे विवरण. महाकाव्यादी महान व मुक्तकादी लघु काव्यांची लक्षणे.

**(२.२.५) राजशेखर : काव्यमीमांसा : +८९०...९२०**

**वैशिष्ट्ये :** प्राचीन आचार्यांच्या विचारांचा संग्रह. १८ अध्याय. काव्यरचना शास्त्राध्ययनानंतर होत असते. अलंकार हे सातवे वेदांग. विद्याशाखा अनंत. काव्य हे पंधरावे विद्यास्थान. साहित्य ही पाचवी विद्या. कवींचे प्रतिभाशास्त्र- प्रभृती कसोट्यांच्या आधारे एकूण ३२ प्रकार. वाक्यांचे दहा प्रकार. पात्रानुरूप भाषाप्रयोग आवश्यक व अभीष्ट. विविध प्रांतीयांच्या उच्चारणशैलीत फरक म्हणजेच भिन्नता. काव्यविषयांचे १६ स्रोत. मुक्तकाचे पाच प्रकार. कवीची दिनचर्या. काव्यनिर्मिती व काव्यपरिष्करण. काव्यविनाशाची कारणे. कविसंमेलने व कविसत्कार. शब्दार्थांची उसनवारी. कविसमय. अनेक प्राचीन ग्रंथांतील विपुल अवतरणे उद्धृत. अनेक अल्पज्ञात वा अज्ञात आचार्यांच्या मतांचा संग्रह. हा ग्रंथ काणे यांच्या मते '... a mine of information on numerous matters' (HSP : 1961 : 210)

**(२.२.६) कुन्तक : वक्रोक्तिजीवित : +९५०...१०००**

**वैशिष्ट्ये :** कारिका, वृत्ती व उदाहरणे. चार उन्मेष. लोकोत्तरचमत्कारी वैचित्र्याची सिद्धी हा काव्यात्मा हा महासिद्धांत. कविव्यापाराने सजलेले शब्द व अर्थ यांचे साहित्य म्हणजे काव्य. सामान्य उक्तीहून भिन्न व उच्च उक्ती ती वक्रोक्ती. वर्णविन्यास, पदपूर्वार्ध, प्रत्यय, वाक्य, प्रकरण व प्रबंध असे वक्रोक्तीचे सहा प्रकार. ह्यांपैकी वाक्यवक्रोक्तीत सर्व अलंकारांचा अंतर्भाव. वक्रोक्ती हे काव्याचे जीवित. वक्रोक्ती प्रतिभानिष्ठ. माधुर्य, प्रसाद, लावण्य व आभिजात्य हे वैचित्र्याचे गुण. कविप्रतिभेमुळे पूर्वप्रसिद्ध कथानकाला अभिनवत्व लाभते. एकाच कथानकावर वेगवेगळ्या कवींनी रचलेल्या काव्यांत फरक जाणवतो. काणे ह्या ग्रंथाचा महिमा पुढील शब्दांत गातात : "... the work is of great value .... the work shows originality, great literary acumen, and is full of charming ideas." (ibid, 234)

**(२.२.७) क्षेमेन्द्र : सुवृत्ततिलक : +९८०...१०६६**

**वैशिष्ट्ये :** छंदःशास्त्रावरील असाधारण ग्रंथ. ३ विन्यास, १२४ कारिका. २७ वृत्तांची लक्षणे सादर केली आहेत. वृत्तांचे गुणदोषनिरूपण केले आहे. रचनादृष्ट्या वृत्तांच्या अनुकूलतेचा विचार. कोणता प्राचीन कवी कोणते वृत्त रचण्यात विशेष प्रवीण त्याचा खुलासा : उदा. अभिनन्द अनुष्टुभात, कालिदास मन्दाक्रान्तात इत्यादी. सूर्यकांत या ग्रंथाचे अनन्यसामान्यत्व वर्णन करताना म्हणतात : 'सुवृत्ततिलक occupies an unique place among works on metres . . . He was pioneer in this type of work without any follower till today.' (KS : 1954 : Intro. 14)

**(२.२.८) भोज : सरस्वतीकण्ठाभरण : +१००५...१०५४**

**वैशिष्ट्ये :** ५ परिच्छेद, ६४३ कारिका. विस्ताराने मोठा ग्रंथ. पद, वाक्य व वाक्यार्थ यांचे दोष प्रत्येकी १६. शब्दगुण २४ + वाक्यार्थगुण २४. शब्द, अर्थ व शब्दार्थोभय अलंकार प्रत्येकी २४. रस, भाव, नायक, नायिका, संधी इत्यादींचा विचार. पूर्वकवींची १५०० उदाहरणपद्ये उद्धृत. वैदर्भी, पांचाली, गौडीया, आवन्तिका, लाटीया व मागधी अशा सहा रीती. जैमिनिप्रोक्त प्रत्यक्ष, अनुमान, आप्तवचन, उपमान, अर्थापत्ती व अभाव ह्या सहा प्रमाणांना अर्थालंकार मानतो. शृंगार हाच एकमेव रस. गुण व रस हेही अलंकारच.

**(२.२.९) भोज : शृंगारप्रकाश : +१००५...१०५४**

**वैशिष्ट्ये :** आकाराने सर्वांत मोठा ग्रंथ. काव्यशास्त्र व नाट्यशास्त्र या दोहोंचा परामर्श. शृंगार हा एकच रस. अर्थाचे १२ प्रकार. शब्दाच्या विविध शक्ती. दोषवर्जन व गुणग्रहण अशी उभयविध प्रक्रिया. शब्द, अर्थ व उभय अलंकार. नाटकाची ६४ वैशिष्ट्ये. हर्ष व ४८ भाव. धर्म-अर्थ- काम-मोक्ष-शृंगाराचे निरूपण. नायकनायिकांचे गुण व विभाग. दूतदूतीकर्मवर्णन. करुणरसनिर्णय. एकूण ४६७ उदाहरणपद्ये. पैकी २५१ प्राकृतात. बाविसाव्या प्रकाशात दोन-तृतीयांश उदाहरणे प्राकृतात.

**(२.२.१०) राजानक महिमभट्ट : व्यक्तिविवेक : +१०२०...११००**

**वैशिष्ट्ये :** शब्दांत अभिधा ही एकच शक्ती असते. सूचित वा ध्वनित अर्थ अनुमानाद्वारे कळतो.

शब्दार्थ व्यंजक नसतात. सर्व प्रकारच्या ध्वनींचा अन्तर्भाव अनुमानात होतो. आनंदवर्धनकृत ध्वनिलक्षणांत दहा दोष आहेत. अर्थाचे वाच्य व अनुमेय असे दोन प्रकार. लक्षणेचा समावेश अनुमानात. अनौचित्याचे अंतरंग व बहिरंग असे दोन भेद. बहिरंग अनौचित्याचे पाच प्रकार. अकाट्य युक्तिवाद, विद्वत्तापूर्ण विवेचन, तर्कशुद्ध विचारसरणी, चोखंदळ समीक्षा व सखोल अंतर्दृष्टी यांचा ग्रंथात संगम. काणे यांच्या मते 'His work is one of the masterpieces of the Alaṅkāra Literature' (HSP : 1961 : 254)

(२.२.११) विद्यानाथ : प्रतापरुद्रयशोभूषण : +१३००...१३१५

**वैशिष्ट्ये :** कारिका+वृत्ती+उदाहरणे. ९ प्रकरणे. दक्षिण भारतात विशेषेकरून विद्वत्प्रिय ग्रंथ. उदाहरणपद्ये प्रतापरुद्रदेवाच्या सन्मानार्थ व प्रशस्तिपर. साहित्यकृतीचे केंद्र नायक. तात्पर्यार्थाचा समावेश व्यंग्यार्थात. गुणवृत्ती लक्षणेहून भिन्न नाही. सादृश्य व संबंध यांवर आधारित लक्षणेचे दोन प्रकार. मध्यमआरभटी व मध्यमकैशिकी अशा दोन अधिकच्या रीती. वृत्ती व रीती यांतील भेदाचे विशदीकरण. नाटकाच्या सिद्धांताच्या स्पष्टीकरणासाठी 'प्रतापरुद्रकल्याण' नामक संपूर्ण नाटक ग्रंथात समाविष्ट. गांभीर्य हा २४ गुणांपैकी एक गुण, ही ह्या ग्रंथाची वैशिष्ट्ये R. Sarat यांनी 'The aesthetics of the Prātāparudrīya' (ABORI LVI : 1975 : 226-229) ह्या निबंधात निदर्शनास आणली आहेत.

(२.२.१२) केशवमिश्र : अलङ्कारशेखर : +१५००...१६००

**वैशिष्ट्ये :** कारिका+वृत्ती+उदाहरणे. कारिका शौद्धोदनीच्या. ८ रत्ने, २२ मरीची. काव्यापासून विशेष प्रकारचे सुख होते. सुंदर अर्थ व्यक्त करू शकणारे रचनापटु तेच कवी. काव्यापासून लाभादी नऊ फळे मिळतात. प्रतिभा=पुण्यविशेष. भाषा सहस्रमुखी असली तरी काव्यरचना संस्कृत, प्राकृत, पैशाची व मागधी यांपैकी एका भाषेत करावी. प्राकृतांचे भेद अनेक. संबंधित प्रांतात शुद्ध स्वरूपात बोलली जाणारी भाषा ती अपभ्रंश. कवीने वरील भाषांचा उपयोग यथामति, यथाशक्ति, यथौचित्य व यथारुचि करावा. रीती, उक्ती, मुद्रा व वृत्ती हे काव्याचे जीवित. उक्तीचे लोक, छेक, अर्भक व उन्मत्त असे चार प्रकार. हर्षोत्पत्ती करणारी ती मुद्रा. शब्द वैचित्र्यपूर्ण स्वभावाचे असतात. निर्दोषता हा महान गुण. एकूण दोषसंख्या ३१. संक्षिप्तत्व, उदात्तत्व, प्रसाद, उक्ती व समाधी हे शब्दगुण. भाविकत्व, सुशब्दत्व, पर्यायोक्ती व सुधर्मिता हे अर्थगुण. दोषांचे अदोषत्व = वैशेषिक गुण. शब्दालंकार ८, अर्थालंकार १४, रूपकाचे भेद अनंत. पुरुष, रत्ने इत्यादींचे वर्णनप्रकार, कविसमय, नायिकाभेद इत्यादींची सूची.

वरील (२) मधील विषयाशी निगडित अशा एका मुद्द्याचा आता परामर्श घेऊ.

## (३) संशोध्य ग्रंथ

भारतीय साहित्यशास्त्रावरील ग्रंथांचे अनुशीलन करीत असताना मधूनमधून काही प्राचीन शास्त्रीय ग्रंथांचे त्रोटक उल्लेख आढळतात. त्या त्रोटक उल्लेखांवरून ते आज उपलब्ध नसलेले ग्रंथ महत्त्वपूर्ण असावेत, असे वाटते. ह्यापूर्वी संशोधकांनी अशा ग्रंथांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला

असेलच, आणि अद्यापिही तो चालू असेलच. तरी सुद्धा अशा निवडक संशोधनयोग्य ग्रंथांकडे अभ्यासकांचे लक्ष वेधण्यासाठी त्यांची खाली थोडक्यात नोंद करीत आहे.

(३.१) दण्डीने (+६०६...७१० : Basham : CHI : 1975 : XIV) 'अवन्तिसुन्दरी'च्या प्रास्ताविक पद्यात प्राकृत भाषेतील साहित्यशास्त्रपर ग्रंथाचा उल्लेख केला आहे, असे मान सिंह यांनी 'The Sources of Daṇḍin's Avantisundari' [ABORI, LVII (1976):59] या निबंधात नमूद केले आहे. हा ग्रंथ उपलब्ध झाल्यास साहित्यशास्त्रात विशेष भर पडेल.

(३.२) भामहाच्या 'काव्यालङ्कार' नावाच्या ग्रंथावर उद्भटाने (+७५०...८५० : HSP : 1961 : 138) 'भामहविवरण' किंवा 'भामहवृत्ति' नामक विस्तृत व्याख्या लिहिली होती, जिचा उल्लेख अनेक उत्तरकालीन ग्रंथकारांनी केलेला दृष्टोत्पत्तीस येतो. (तत्रैव, पृ.१३४-३५)

(३.३) भट्टनायकाने (+९३५...९८५ : HSP : 1961 : 221-25) 'हृदयदर्पण' किंवा 'सहृदयदर्पण' नावाचा एक ग्रंथ लिहिला होता. त्यात त्याने रस हा उपभोग्य बनत असतो, काव्यात व नाटकात अभिधा, भावना व भोगीकृती (=रसचर्वणा वा भोग) अशी शब्दाची तीन कार्ये असतात, भावनेद्वारे सीताप्रभृती विभावांचे सादरीकरण व्यक्तिनिरपेक्षपणे केले जाते. भोग हे कार्य वाचकाला वा प्रेक्षकाला स्वतःला जाणवणारे (स्वसंवेद्य) असून शब्दांद्वारे वर्णनीय नसते, भोगानुभूतीच्या वेळी वाचक वा प्रेक्षक बाकी सर्व विसरतो आणि वर्ण्यविषयाशी तादात्म्य पावतो, काव्य हे सर्वथा कविव्यापारावर अवलंबून असते, असे वैशिष्ट्यपूर्ण विचार मांडले आहेत. म्हणूनच हा ग्रंथ उपलब्ध होऊ शकला तर त्यायोगे भारतीय साहित्यशास्त्रात मोलाची भर पडेल (तत्रैव).

(३.४) भट्टतौतांनी 'काव्यकौतुक' नावाचा ग्रंथ लिहिला आहे (HSP : 1961 : 218-220). त्यात त्यांनी पुढील मननीय विचार व्यक्त केले आहेत : शांतरस हा सर्वप्रथम रस; नाट्य म्हणजे आनंदस्वरूप रस; जेव्हा काव्यातील वर्ण्य वस्तू वा व्यक्ती वाचकाला जणू आपल्यासमोर असल्याचे वर्णनाद्वारे भासते तेव्हाच रसप्रचीती येते. करुण रस स्वतंत्रपणे सर्व प्राण्यांत संभवतो; महान कवींनीही नाटक परिणामकारक करण्यासाठी क्रमरक्षणाकडे लक्ष पुरविणे आवश्यक असते; रस हा चमत्कृती व मनोहारित्व यांचा खजिना होय; नाटकातील गद्य-पद्य-काव्यात सैंधवीसकट कोणतीही भाषा वापरण्यास प्रतिबंध नाही. (तत्रैव)

(३.५.१) क्षेमेन्द्राने (+९९०...१०६६ : HSP : 1961 : 417) आपल्या 'औचित्यविचारचर्चा' नावाच्या साहित्यशास्त्रविषयक ग्रंथाच्या दुसऱ्याच कारिकेत 'कृत्वापि काव्यालंकारां क्षेमेन्द्रः कविकर्णिकाम् ।' (क्षेमेन्द्रलघु- काव्यसङ्ग्रहः : १९६१ : ११) ह्या शब्दांत 'कविकर्णिका' नामक ग्रंथाचा उल्लेख केला आहे. हा ग्रंथ स्वतंत्र की हा व 'कविकण्ठाभरण' हे दोन्ही एकच ह्या विषयाबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. हा वेगळा ग्रंथ नसावा असे वाटते, त्याची कारणे दोन : एक म्हणजे क्षेमेन्द्राने चमत्कृती व औचित्य असे दोन सिद्धान्त मांडले आहेत आणि दुसरे म्हणजे

त्याने कविकंठाभरणात शब्दवैमल्य, अर्थवैमल्य व रसवैमल्य अशा तीन गुणांची आणि शब्दकालुष्य, अर्थकालुष्य व रसकालुष्य अशा तीन दोषांची चर्चा केलेली आहे. (तत्रैव, पृ.७५). त्याला अलंकारांची चर्चा करण्यात स्वारस्य असावे, असे वाटत नाही. म्हणूनच हा स्वतंत्र ग्रंथ नसावा असेच मानण्याकडे मनाचा कल होतो. मात्र कधी काळी हा ग्रंथ उपलब्ध झाला तर त्याचे स्वरूप आपोआपच स्पष्ट होईल.

(३.५.२) राजतरंगिणीत (१.१३) क्षेमेन्द्राच्या नृपावली ऊर्फ राजावली नामक ग्रंथाचा उल्लेख आहे (HSP : 1961 : 264). परंतु तो ग्रंथ अजून उपलब्ध झालेला नाही. त्याची अनुपलब्धी ही संस्कृत साहित्याची मोठी हानी होय, असे कीथ (HSL : 1953 : 161) मानतात.

(३.६) महिमभट्टाने (०१०२०...११०० : HSP : 1961 : 256) स्वतःच 'इत्यादि प्रतिभातत्त्वमस्माभिरुपपादितम् । शास्त्रे तत्त्वोक्तिकोशाख्ये इति नेह प्रपञ्चितम्।। (तत्रैव, पृ. २५४) ह्या शब्दांत आपण तत्त्वोक्तिकोश नावाचा काव्यशास्त्रीय ग्रंथ लिहिल्याचे नमूद केले आहे. पण तो ग्रंथ आजतागायत उपलब्ध झालेला नाही.

(३.७) नमिसाधु (०१०६८...६९ : तत्रैव, पृ.१५५) नामक टीकाकाराने रुद्रटाच्या काव्यालंकाराच्या (२.१९) ह्या कारिकेवरील टीकेत हरी नावाच्या प्राकृत साहित्यशास्त्रज्ञाचा उल्लेख केला आहे. (तत्रैव, पृ.१५६).

(३.८) धनंजयाच्या 'दशरूपा'चा टीकाकार धनिक ह्याने पूर्वोक्ताच्या ४.३७ वरील स्वरचित टीकेत आपण काव्यनिर्णय नावाचा ग्रंथ लिहिला असल्याचा उल्लेख करून त्यातील आठ श्लोक उद्धृत केले आहेत. (तत्रैव, पृ. २४६)

आता स्वतंत्रपणे अभ्यसनीय अशा काही विषयांकडे वळू.

## (४) संस्कृत्यतीत दृष्टिकोणातून अभ्यास

### (४.१) काव्याची भाषा ही मानवी मनाची भाषा

काव्याची भाषा ही मनुष्याच्या अंतःकरणाची भाषा असते. माणूस हा पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र सारखा म्हणजे 'माणूस'च असतो. रती, हास, शोक, क्रोध, उत्साह, भय, जुगुप्सा, विस्मय व शम ह्या चिरस्थायी भावना आणि धृती, स्मृती, मती, व्रीडा, जाड्य, विषाद, मद, व्याधी, निद्रा, सुप्त, औत्सुक्य, अवहित्थ, शंका, चापल, आलस्य, हर्ष, गर्व, औग्र्य, प्रबोध, ग्लानी, दैन्य, श्रम, उन्माद, मोह, चिंता, अमर्ष, त्रास, अपस्मार, निर्वेद, आवेग, वितर्क, असूया, व मृती ह्या विशिष्ट कारणाने वा प्रसंगाने उत्पन्न होणाऱ्या पण कालांतराने शांत होणाऱ्या (म्हणजेच कायमच्या स्वरूपात न राहणाऱ्या म्हणजेच तात्कालिक) भावना सर्व मानवजातीच्या अनुभवास येत असतात. त्या दृष्टीने मानवी मनाची भाषा व तिची स्पंदने ही विश्वात्मक असतात. ही स्पंदने ललित साहित्यात शब्दांकित केलेली असल्यामुळे त्यांच्या संबंधाने मांडण्यात आलेले सिद्धांत प्रांत, देश, खंड, भौगोलिक वा नैसर्गिक वातावरण ह्यांच्या अतीत असतात. म्हणूनच संस्कृत्यतीत दृष्टिकोणातून

ललित साहित्याचा अभ्यास संभवतो. इंग्रजी भाषा आपल्या देशात प्रचलित झाल्यानंतर त्या भाषेतील साहित्यशास्त्रीय ग्रंथांत प्रतिपादिलेल्या तत्त्वप्रमेयादींच्या प्रकाशात आपण भारतीय साहित्याचे अध्ययन, समीक्षण व मूल्यांकन सुरू केलेच ना? तद्वत भारतीय साहित्यशास्त्रात प्रतिपादिलेल्या सिद्धांतांनुसार पाश्चात्य साहित्याचे अनुशीलन, आलोचन व मूल्यमापन करण्यात गैर वा आक्षेपार्ह काहीच नाही. किंबहुना, अशा प्रकारची वैचारिक देवघेव जितक्या अधिक प्रमाणात होईल तितकी विविध संस्कृतींची व त्यांच्या वाङ्मयांची अधिक प्रमाणात ओळख होईल आणि ती ओळख त्या संस्कृतींना बौद्धिक व भावनिक दृष्ट्या एकमेकींच्या जवळ आणण्यास सहायक ठरेल. अशा उपक्रमास सी. राजेंद्रन यांनी आपल्या A Transcultural Approach to Sanskrit Poetics (Calicut, the author, 1994) या निबंधसंग्रहातील एका निबंधात कुन्तकाच्या वक्रोक्तिसिद्धान्ताच्या आधारे शेक्सपिअरच्या मॅकबेथचे विश्लेषणात्मक अध्ययन प्रायोगिक स्वरूपात सादर करून, सुरुवातही केली आहे. त्यांच्या त्या उपक्रमाविषयी सरोजा भाटे यांनी पुढील शब्दांत रास्त अभिमत व्यक्त केले आहे : 'The book is a classic example of good prospects for East-West dialogue' [ABORI, LXXVII (1996) : 317] असा 'dialogue' कोणकोणत्या प्रकारांनी करणे शक्य आहे, ते ह्या उपविभागात दाखवून देण्याचा उद्देश आहे.

**(४.२) गाहासत्तसईचा पाश्चात्य शैलीशास्त्रीय अभ्यास**

हालसंकलित गाहासत्तसईतील खालीलसारख्या विदग्धोक्ती वाचून कोणाही रसिक अभ्यासकाला त्या ग्रंथाचा पाश्चात्य शैलीशास्त्राच्या निकषांच्या आधारे विश्लेषणात्मक अभ्यास करण्याचा मोह झाल्याशिवाय राहणार नाही.

• कळस कोसळल्यामुळे वरच्या बाजूला उघड्या पडलेल्या कांबीवर विसावलेल्या पारव्यांच्या घुमण्याच्या रूपाने हे देवालय सुळी दिलेल्या माणसाप्रमाणे वेदनार्त होऊन आक्रंदत करीत आहे (शेफालिका : १९८४ : २५/६४).

• जबरदस्त रागाने ही व्याकुळ झालेली असताही प्रियकराविषयी हिने घेतलेला मान पहा कसा मुठीतल्या वाळूसारखा सुरसुर करीत ओघळून जात आहे (तत्रैव, २९/७४).

• माणकापाचूने जडवलेली कंठी गगनश्रीच्या गळ्यातून ओघळावी तशी ही पोपटांची माळ आकाशातून खाली उतरत आहे (तत्रैव, २९/७५).

• कुणीतरी गावातल्या तळ्यात आभाळ कसे उताणे टाकून दिले आहे. (तत्रैव, ४४ / ११०).

• आजच प्रवासाला गेला, आज गेला, आज गेला, अशी गणना करीत करीत तिने पहिल्याच दिवसाच्या पूर्वार्धात भिंत रेघांनी भरून काढली. (तत्रैव, ८८/२०८)

• बालका, वडीलधाऱ्या माणसांसमक्ष पाटलाच्या मुलीने टक लावून किंचित तोंड वळवून आणि कटाक्ष टाकून (तुझ्याकडे पाहिले, त्यात) तिने काय काय म्हणून सांगितले नाही ? (तत्रैव, १५१ / ३७०)

• अशोका, ज्याअर्थी सुंदर तरुणीच्या हाताला तुझ्या पल्लवाची उपमा देतात, त्याअर्थी तुझ्यापाशी पुरेसे नाही, असे काहीच नाही. (तत्रैव, १६४ / ४०४)

• पाण्यात मिसळलेले दूध जशी राजहंसी निवडून घेते तशी ती बाला तुझे बोलणे लोकांच्या गलबल्यात मिसळलेले असले तरी ते कर्णांजलींनी पीत राहते. (तत्रैव, २७१/६७६)

• असा हस की ज्यायोगे तुझे हसे होणार नाही,
असे बोल की जे लोकांना हवेहवेसे होईल,
असा जग, की ज्यामुळे कीर्तीची जोड होईल,
असा मृत्यू पत्कर की पुन्हा जन्म म्हणून तुला येणार नाही
(तत्रैव, ३२४ / ८११)

वरील पंक्तींत उपमा, उत्तरगर्भ प्रश्न, अन्यधर्मारोप, नकार, समानांतरता, विचलन इत्यादी अनेक शैली-उपाय लीलया हाताळलेले आढळतात. +५० ते +२०० च्या दरम्यान रचलेली गाहासत्तसई अभिजात प्राचीन कवींच्या आणि आधुनिक नवकवींच्या तोडीस तोड आहे, असा निःसंदिग्ध निर्वाळा कोणीही सहृदय रसिक आनंदाने देईल.

### (४.३) शाकुन्तल : शैलीशास्त्रीय अभ्यास

प्रस्तुत भाषणकर्त्याने कालिदासाच्या शाकुंतल नाटकाला पाश्चात्य शैलीशास्त्राच्या कसोट्या लावून त्याचा पृथक्करणात्मक अभ्यास केला असून तो आज पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे, हे आपणांस ठाऊक आहेच.

### (४.४) पौरस्त्य साहित्यसिद्धांत व पाश्चात्य साहित्य

प्राचीन भारतीय काव्यमीमांसकांनी अलंकार, रीती, ध्वनी, वक्रोक्ती, अनुमान, औचित्य, (दशरूप) चमत्कार व रस असे साहित्यसमीक्षेचे सिद्धांत मांडले आहेत. त्यांपैकी एकेक निवडून त्याच्या आधारे शॉ, शेक्सपिअर प्रभृतींची नाटके, शेली, कीटस्, वर्डस्वर्थ प्रभृतींच्या कविता, मिल्टनप्रभृतींची महाकाव्ये, चेकॉव्ह प्रभृतींच्या कथा, जेन ऑस्टिनप्रभृतींच्या कादंबऱ्या इत्यादी साहित्यकृतींचा विश्लेषणात्मक अभ्यास करावयास हवा.

प्रियदर्शी पटनाईक यांचे 'Rasa in Aesthetics - An Application of Rasa Theory to Modern Western Literature (New Delhi, 1997) असे एक पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

### (४.५) पाश्चात्य साहित्यसिद्धांत आणि पौरस्त्य साहित्य

वरील (४.४) च्या विरुद्ध प्रयोगही करण्यासारखा आहे. Reader-Response Theory, Structuralism व Deconstruction हे अलिकडचे विशेष गाजलेले पाश्चात्य साहित्यविषयक सिद्धांत आहेत. ह्यांपैकी एकेकाचा क्रमशः विचार करू. प्रथमतः Reader-Response Theory विचारात घेऊ. Wolfgang Iser व Stanley Fish ह्या दोघांनी हा सिद्धांत मांडला आहे. सी. राजेंद्रन यांनी ह्याचा जो संक्षिप्त परिचय करून दिला आहे त्याचा गोशवारा असा : वाचकाच्या ठायी काव्यार्थनिरूपणशक्ती असते. ती साहित्यकृतीतील पोकळ्या भरून काढते.

अभिज्ञ वाचकाच्या प्रतिसादामुळेच साहित्यकृतीचा अर्थ पूर्ण होतो. (त्या अर्थाला परिपूर्णता लाभते.) ध्वनि- सिद्धांतात सहृदय वाचक व कवी ह्यांना स्तरदृष्ट्या समान मानले आहे. अभिनवगुप्ताने म्हटले आहे की, 'सरस्वत्यास्तत्त्वम् कविसहृदयं विजयते ।' 'कवितारसमाधुर्यं व्याख्याता वेत्ति नो कवि: ।' असे ह्या संदर्भातील आणखी एक प्रसिद्ध सुवचन आहे. तदनुसार तर कवीने रचलेल्या काव्याचा खरा अर्थ त्याला स्वत:ला कळत नाही, तर तो सहृदयाला कळतो. काव्यार्थ जाणून घेण्याची वाचकाच्या ठायी ही जी शक्ती असते तिच्या कारणास्तवच एकेका साहित्यकृतीवर प्राचीन काळात अनेक व्याख्या लिहिल्या गेलेल्या आढळतात. (TASP : 1994 : 90-91)

साहित्यव्यवहारात सहृदय वाचकाची भूमिका महत्त्वाची असते ह्याची जाणीव प्राचीन भारतीय साहित्यशास्त्रकारांनाही होती, हे खालील तपशिलावरून स्पष्ट होईल :

• नाट्यकृती सहृदयसंवेद्य असली पाहिजे याची जाणीव भरताला होती.

• कालिदासाने शाकुंतलाच्या प्रारंभी काढलेले 'आपरितोषाद् . . .' इत्यादी उद्‌गार सर्वविदित आहेत.

• काव्य प्रतिभानिर्मित असले तरी त्याच्या योगे बुद्धिमान वाचकाचा विरस होता कामा नये, तसे झाल्यास ते काव्य त्याज्य ठरते [(भामह) काव्यालंकार : १९६२ : ४९-५०], असे भामहाचे ठाम मत होते.

• रसिकांचा परितोष ही काव्याच्या सदसत्त्वाची अंतिम कसोटी होय (यदि उपात्तेषु संपत्तिराराधयति तद्विद: । - काव्यलक्षणम् : १९५७ : १४), सत्काव्य हे रसिकांच्या पसंतीस उतरले पाहिजे (सुकुमारतयैवैतदारोहति सतां मुखम् । - तत्रैव, पृ.४४), जे काव्य रसिकांची हृदये खुलविते ते काव्य किंचित सदोष असले तरी उत्कृष्टच ठरते (उपमादूषणायालं यत्रोद्वेगो न धीमताम् । तत्रैव, पृ.८३), असे उद्‌गार दण्डीने आपल्या ग्रंथात एकाधिक ठिकाणी काढले आहेत. एकंदरीने दण्डीच्या मते, विदग्ध सहृदयाचे सुसंस्कृत व अभिरुचिसंपन्न मत हाच काव्याच्या सदसन्निर्णयाचा अंतिम व सर्वोच्च निकष होय.

• प्रतीहारेन्दुराजाने भाविक अलंकाराच्या टीकेत पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे. कवीचा अभिप्राय काव्यात प्रतिबिंबित होत असतो. तसे काव्य आस्वादिल्यावर रसिकांनाही कवीच्या अभिप्रायाची प्रचीती येते; किंबहुना त्या अभिप्रायाचा जणू साक्षात्कार होतो. रसिकांचा व कवीचा आशय यांमध्ये अभिन्नता निर्माण होते. अशा प्रकारे भाविक अलंकारात कवीचा व सहृदयांचा असे दोघांचे भाव एकमेकांत मिसळून जातात. प्रासादिक शब्दार्थांचा चांगल्या प्रकारे आस्वाद घेतल्यामुळे वाचकाचा आत्मा द्रवीभूत होतो व त्याच्या मनात कवीच्या मनातल्या सारखाच भाव उत्पन्न होतो. थोडक्यात, कवी जे व जितक्या उत्कटतेने अनुभवतो तेच रसिकही तितक्याच उत्कटतेने अनुभवतो. कवी व सहृदय यांचे असे मानसिक ऐक्य सर्व उत्कृष्ट काव्यांच्या बाबतीत घडून येते (काव्यालङ्कारसारसङ्ग्रह : १९२५ : ७९-८०)

• केशवमिश्राने 'तादृक् काव्यं प्रकुर्वीत यत्रोद्वेगो न धीमताम् ।' (अलंकारशेखर : १९२७:२०)

अर्थात, कवीने काव्य असे लिहावे की जे वाचल्यावर बुद्धिमान रसिकाला उद्वेग वाटू नये, असा उपदेश एके ठिकाणी केला आहे व दुसऱ्या ठिकाणी 'अलंकारे गुणे दोषे रसे वा काव्यसंपदाम्। प्रतीतिरेव विदुषां प्रमाणं अवसीयते ।' (तत्रैव, पृ.२४), अर्थात - काव्यातील अलंकार, गुण, दोष वा रस ह्या काव्यधर्मांच्या बाबतीत विद्वद्रसिकांची प्रचीती हेच अंतिम प्रमाण होय, असा सिद्धांतप्राय विचार मांडला आहे.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, Reader-Response Theory ही प्राचीन भारतीयांनी नाट्यशास्त्रकाराच्या काळातच मांडली होती आणि भामहादी उत्तरकालीनांनी तिचे पूर्णपणे समर्थन केले होते.

### (४.६) Structuralism व पौरस्त्य काव्य

ह्याबाबतीत सी. राजेंद्रन यांनी Gerad Genette यांच्या निरूपणाच्या आधारे जो खुलासा केला आहे त्याचा सारांश असा : रचनावाद हा शब्दबंधांवर आधारित आहे. संरचना म्हणजे सुप्त संबंधाची व्यवस्था. वाङ्मय जरी भाषेचा वापर करीत असले तरी वाङ्मय स्वत:च भाषा असते, कारण त्या भाषेचा अर्थ संकेतपद्धतीमुळे समजतो. एखाद्या भावगीतात व वृत्तपत्रात वापरलेले एकच वाक्य अगदी निरनिराळे अर्थ व्यक्त करते. एखाद्या वाक्याचे कसे अर्थग्रहण करावयाचे ते लेखक व वाचक यांच्यातील अलिखित करारावर अवलंबून असते (TASP : 1994 : 86).

भारतीय काव्यशास्त्राने दशरूपके, महाकाव्य, कथा, आख्यायिका, चंपू, इत्यादी विविध वाङ्मयप्रकारांची लक्षणे सांगताना त्यांच्या भाषा, सर्गादी विभाग, संधी, संध्यंग, छंद, आरंभ (उदा. नाटकाचा आरंभ नांदीने) शेवट (नाटकाचा शेवट भरतवाक्याने: महाकाव्यात सर्गाच्या अखेरचा श्लोक वेगळ्या वृत्तात, इत्यादी), भाषांचे मिश्रण इत्यादी नानाविध रचनात्मक अंगोपांगांचे विवरण केलेले आहे. त्याचा तपशील देण्याची गरज नाही. मात्र एकच वाक्य निरनिराळ्या वाङ्मयप्रकारात वापरल्यास ते निरनिराळे अर्थ व्यक्त करते असे जे प्रतिपादन ह्या वादात करण्यात आले आहे ते पटत नाही. कारण तसे प्रत्यक्षात अनुभवास येत नाही आणि तसे घडून आले तर अनर्थ ओढवेल. ह्या वादावर जो मुख्य आक्षेप घेण्याजोगा आहे तो असा की, हा वाद साहित्यकृतीच्या केवळ बहिरंगाचा विचार करतो, तिच्या अंतरंगाला ( किंवा आत्मतत्त्वाला) स्पर्शसुद्धा करीत नाही. ह्याउलट भारतीय साहित्यशास्त्रज्ञांनी अलंकार, रीती, वक्रोक्ती, औचित्य, चमत्कृती, अनुमिती, ध्वनी आणि रस असे साहित्यजीवितविषयक आठ सिद्धांत मांडून त्यांची विस्ताराने चर्चा केली आहे. एकंदरीने रचनावाद ही साहित्यकृतीच्या फक्त बाह्यांगापुरता विचार करणारी म्हणून अग्राह्य विचारसरणी आहे.

### (४.७) Deconstruction व पौरस्त्य काव्य

डेरिडा (Derrida) नामक एक पाश्चात्य दार्शनिक ह्या सिद्धांताचा प्रणेता आहे. शब्दापासून होणारा अर्थाचा बोध हा निव्वळ भ्रम आहे, ह्या केंद्रीय तत्त्वावर हा सिद्धांत आधारित आहे. त्याचा साहित्य, साहित्यापासून होणारा अर्थबोध आणि साहित्यशास्त्र यांच्याशी जो संबंध आहे त्याचाच विचार करू. (उर्वरित भाग भाषाशास्त्राशी संबद्ध असल्यामुळे त्याचा परामर्श पुढे यथावकाश घेऊ.)

सी. राजेन्द्रन ह्यांनी प्रस्तुत सिद्धांताचा जो परिचय करून दिला आहे त्याचा सारांश असा : कोणत्याही साहित्यकृतीपासून निश्चित व अंतिम अर्थाचा बोध होत नसतो. तो कायमचा ग्राह्य असा नसतोच. शब्द हे अवशेषांकित असतात, ते भूतकालीन व भविष्यकालीन अशा सर्व संभाव्य अज्ञात अर्थांनी ओतप्रोत असतात. सकृद्दर्शनी निर्णायक भासणारा कोणताही अर्थ हा त्या अज्ञात अर्थांपासून प्राप्त झालेला असतो. कोणत्याही साहित्यकृतीपासून तद्‌बाह्य असे काहीही निष्पन्न होत नसते आणि ज्याला आपण साहित्यकृतीचे अर्थनिरूपण म्हणतो ती केवळ मुक्त क्रीडा असते. भाषा ही स्वभावत: फसवी असल्यामुळे ती स्वत:वरच उलटते. त्यामुळे एखाद्या भाषाप्रयोगाची बारकाईने तपासणी केली की, त्याच्यातील अंगभूत अंतर्विरोध पृष्ठभागावर येऊन स्पष्टपणे लक्षात येतात. समीक्षा वा समीक्षाशास्त्र हेही भाषेतच निबद्ध असल्यामुळे तेही समीक्ष्य साहित्यकृतीचे अस्सल स्वरूप आपल्याला जाणवून देऊ शकत नाही. (TASP : 1994 : 89)

ह्याबाबतीत पुढीलप्रमाणे युक्तिवाद थोडक्यात करता येईल. कोणताही रसिक कोणत्याही साहित्यकृतीपासून अंतिम व निर्णायक अर्थाचा बोध व्हावा ह्यासाठी तिच्या आस्वादास प्रवृत्त होत नसतो. एकाच साहित्यकृतीपासून भिन्नभिन्न रसिकांना भिन्नभिन्न सूक्ष्म अर्थच्छटा जाणवतात हे अनुभवसिद्ध सत्य आहे. ह्या अनुभवाला संबंधित रसिकाचे भाषाज्ञान, त्याच्यावर झालेले साहित्यिक संस्कार, त्याची बहुश्रुतता, मानवी जीवनातील अनुभवांची सखोलता, विविधता व संख्या, साहित्यप्रकार व साहित्यिक ह्यांबद्दलचे ग्रह, पूर्वग्रह, आग्रह, आस्वादकालीन मन:स्थिती इत्यादी अनेक घटक कारणीभूत असतात. पण याचा अर्थ असा नव्हे की, अर्थबोधाच्या बाबतीत पूर्ण अराजक असते. प्रत्येक साहित्यकृतीपासून एका विशिष्ट मर्यादेपर्यंतचा अर्थबोध सर्वच आस्वादकांना समान स्वरूपात व समान प्रमाणात होत असतो.

छंदोबद्ध कवितेत वाचकाला शब्दांचा अन्वय जुळवून घेऊन मगच पद्यार्थ समजून घ्यावा लागतो; कवीचा संपूर्ण अभिप्राय लक्षात यावा यासाठी रसिकाला शब्दांची पदरमोड करावी लागते; बुद्धिपुरस्सर केलेली शाब्दी पुनरुक्ती समजून घ्यावी लागते; अनेक स्थळी 'म्हणजे अर्थ' ग्रहण करावा लागतो; कवीचा रोख ध्यानात घ्यावा लागतो; कधी साक्षात प्रयुक्त शब्दांच्या पलीकडचा अर्थ रसिकाच्या मनात रुंजी घालू लागतो (ह्या विषयाच्या सविस्तर खुलाशासाठी पहा : भाषा, साहित्य व शास्त्र काही विचार : १९९१ : १-१८). छंदोबद्ध कवितेच्या बाबतीत असा अनुभव येणे हे वैगुण्य नसून स्पृहणीय वैशिष्ट्य आहे.

एकाच पद्याचे विभिन्न दृष्टिकोनांतून आकलन, आस्वादन व समालोचन होत असते हे पुढे (५) मध्ये दाखवून देण्यात येईल. त्यामुळे ह्या मुद्द्याचाही विचार करण्याची गरज नाही. दृष्टिकोनांची व आस्वादांची विविधता असते म्हणून तर विविध काव्यकृतींचे वेगवेगळ्या कालखंडांत पुनरास्वादन व पुनर्मूल्यांकन होत असते आणि ही प्रक्रिया नेहमीच आनंददायक असते. तिच्या योगे भूतकालीन साहित्यकृतींची पूर्वी अलक्षित राहिलेली सौंदर्यस्थळे प्रत्ययास येतात.

भाषेचा स्वाभाविक फसवेपणा हा विचारही नवीन नाही. किंबहुना भाषेच्या ह्या वैशिष्ट्याचा फायदा घेऊनच साहित्यशास्त्रकारांनी श्लेष अलंकार मानला आहे. उदाहरणार्थ, दण्डीने ह्या अलंकाराचे तब्बल चौदा आल्हाददायक प्रकार मानले आहेत (काव्यलक्षणम् : १९५७ : ७१-१७८)

कोणत्याही साहित्यकृतीचे समीक्षण हा त्या कृतीसंबंधीचा अखेरचा शब्द कधीच नसतो. एकंदरीने Deconstruction सिद्धांत पटत नाही.

## (५) एकाच पद्याचे विभिन्न दृष्टिकोणांतून समीक्षण

संस्कृत साहित्यशास्त्रीय ग्रंथांत असे अनेक श्लोक दृष्टिपथात येतात की जे एकाहून अधिक शास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या काव्यधर्मांच्या वा तत्त्वांच्या समर्थनार्थ किंवा इतरांच्या मतांच्या खंडनार्थ उद्धृत केले आहेत. असे श्लोक एकाच काव्यार्थाकडे पाहण्याचे निरनिराळे दृष्टिकोण आपल्या निदर्शनास आणतात. कधी कधी एखाद्या पद्यात एका शास्त्रकाराला विशिष्ट गुण प्रतीत होतो तर दुसऱ्या शास्त्रकाराला दोष जाणवतो. मतभिन्नतेचे हे वैचित्र्य व वैविध्य, काव्यकलेत पूर्ण वस्तुनिष्ठ आकलन व आस्वादन संभवत नाही, त्यात आंशिक व्यक्तिनिष्ठा अवश्य असते हे तत्त्व सूचित करते. ह्या वैशिष्ट्याची निवडक पाचसहा उदाहरणपद्ये लक्षात घेऊ :

### (५.१) इयं गेहे . . .

'इयं गेहे लक्ष्मीरियममृतवर्तिर्नयनयो -

रसावस्या: स्पर्शो वपुषि बहलश्चन्दनरस: ।

अयं कण्ठे बाहु: शिशिरमसृणो मौक्तिकसर:

किमस्या न प्रेयो यदि परमसह्यस्तु

विरह : ।।

हा श्लोक हेमचंद्राने (काव्यानुशासन : १९३४:३६१) एकपत्नी असलेल्या अनुकूल नायकाचे उदाहरण म्हणून उद्धृत केला आहे. महिमभट्टाने हाच श्लोक अवाच्यवचनदोषाचे उदाहरण म्हणून सादर केला आहे (व्यक्तिविवेक २.९९) तर वामनाने हे रूपकाचे उदाहरण मानले आहे, हा दृष्टिकोणगत फरक तपस्वी नंदी यांनी 'Bhavabhūti and Sanskrit Literary Criticism [ABORI, LXXVII (1996) : 149] या निबंधात निदर्शनास आणला आहे.

### (५.२) उपोढरागेण . . .

'उपोढरागेण विलोलतारकं तथा गृहीतं शशिना निशामुखम् ।

यथा समस्तं तिमिरांशुकं तया पुरोऽपि रागाद्गलितं न लक्षितम् ।।'

सायंसंध्यावर्णनपर ह्या श्लोकात आनन्दवर्धनाला प्रतीयमान अर्थ जाणवतो (ध्वन्यालोक : १९५३ : ४७) तर महिमभट्टाला ह्यात प्राकरणिक अर्थ प्रतीत होतो (व्यक्तिविवेक : १९७९ : ८).

### (५.३) ग्रामतरुणं . . .

ग्रामतरुणं तरुण्या नवमञ्जुलमञ्जरीसनाथकरम्।

पश्यन्त्या भवति मुहुर्नितरां मलिना मुखच्छाया।।

रुद्रटाने [(रुद्रट) काव्यालंकार : १९२८ : ८३] हे पद्य भाव नावाच्या अलंकाराचे उदाहरण मानले आहे. रुद्रटाने अर्थालंकाराचे वास्तव, औपम्य, अतिशय व श्लेष असे चार मोठे वर्ग मानले आहेत (तत्रैव, पृ.७६). त्यांपैकी वास्तव वर्गातील

पाचवा उपभेद भाव हा होय. मम्मटाच्या मते ह्या श्लोकात वाच्यार्थच व्यंग्यार्थाच्या तुलनेने अधिक चित्तवेधक आहे, व्यंग्यार्थ गौण आहे. म्हणून तो हे पद्य गुणीभूत व्यंग्यकाव्याचे उदाहरण मानतो (काव्यप्रकाश : १९६५:२१). गुणीभूतव्यंग्य काव्य हे मध्यम प्रकारचे काव्य मानले जाते. अलंकारशेखरकृत केशवमिश्रालाही प्रस्तुत पद्यात मध्यम प्रकारच्याच काव्याची प्रचीती येते (अलंकारशेखर : १९२७ : १२.१३).

(५.४) निःशेषच्युत . . .

निःशेषच्युतचन्दनं स्तनतटं निर्मृष्टरागोऽधरो
नेत्रे दूरमनञ्जने पुलकिता तन्वी तवेयं तनुः।
मिथ्यावादिनि दूति बान्धवजनस्याज्ञातपीडागमे
वापीं स्नातुमितो गतासि न पुनस्तस्याधा मस्यान्तिकम् ।।

या पद्यात वाच्यापेक्षा व्यंग्यार्थच प्रकर्षाने जाणवतो, त्यामुळे हे उत्तम ध्वनिकाव्याचे उदाहरण होय, असे मम्मटाला वाटते (काव्यप्रकाश : १९६५ : १९-२०). केशवमिश्राने हे व्यंजना ह्या पदवृत्तीचे निदर्शक पद्य मानले आहे (अलंकारशेखर : १९२७ : १०)

(५.५) सा बाला . . .

सा बाला वयमप्रगल्भवचसः सा स्त्री वयं कातराः
सा पीनोन्नतिमत्पयोधरयुगं धत्ते सखेदा वयम्।
साऽऽक्रान्ता जघनस्थलेन गुरुणा गन्तुं न शक्ता वयं
दोषैरन्यजनाश्रितैरपटवो जाताः स्म इत्यद्भुतम्।।

वामनाला ह्या पद्यात विरोध अलंकार प्रतीत होतो (काव्यालंकारसूत्रवृत्ति : १९७९ : चतुर्थाधिकरण : ५४) तर केशवमिश्र हे पद्य अन्यदेशत्व नामक अर्थालंकाराचे उदाहरण मानतो (अलङ्कारशेखर : १९२७ : ३८)

अशी शेकडो उदाहरणपद्ये साहित्यशास्त्रीय ग्रंथांत विखुरलेली आढळतील. ती सर्व संकलित करून वेगवेगळ्या साहित्यशास्त्रज्ञांनी त्यांचे कसे वेगवेगळ्या निकषांधारे अर्थाकलन व रसास्वादन केले आहे ते अभ्यासणे खचित मनोरंजक व उद्बोधक ठरेल.

(६) विशिष्ट विषयांचा विमर्शात्मक अभ्यास

(६.१) कविसमय

प्राचीन भारतीय कवींना लोकस्वभाव, शास्त्रीय (नियम व) सिद्धांत आणि कविसमय अशा तीन नियामकांच्या मर्यादा सांभाळून काव्यरचना करावी लागत असे, तरच ती निर्दोष, सगुण व रसिकग्राह्य बनत असे. ह्या तिहींपैकी कविसमय ह्या विषयावर मराठीत स्वतंत्रपणे लघुप्रबंधवजा अभ्यास होणे आवश्यक आहे. कविसमय, कविसंप्रदाय, कविमत व कविप्रसिद्धी हे सर्व पर्यायवाचक शब्द आहेत. ह्या विषयावर विष्णुस्वरूप यांनी 'कविसमयमीमांसा' (काशी हिन्दू विश्वविद्यालय, वाराणसी, २०-४-१९६३) शीर्षकाचा एक अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला आहे.

वरील ग्रंथात विष्णुस्वरूप असे प्रतिपादन करतात की, काव्याच्या अनेक प्रसंगांचे मर्म जाणण्यासाठी कविसमयांचे गहनतर ज्ञान रसिकाला

व कवीलाही आवश्यक असते. कविसमयानुसार व्यक्त केलेला अर्थ नितांत काल्पनिक किंवा अस्तित्वशून्य नसतो. कविसमय काव्य अधिकाधिक रमणीय बनवतात. कविसमय हे काव्यसौंदर्याच्या अनेक आधारांपैकी एक महत्त्वपूर्ण आधार होत. कविसमयगत सौंदर्यादर्श सांस्कृतिक पार्श्वभूमीत बद्धमूल असतात. त्यांच्या योगे काव्याला सर्वग्राह्यता व सर्वसमावेशकता प्राप्त होते. कवी व त्याचा देश तसेच काल याच्या सौंदर्याचा बोध कविसमयांमुळे होतो. कविसमय काव्यार्थाच्या अभिव्यक्तीच्या कौशल्याच्या मूल्यांकनास साहाय्यभूत होतात (तत्रैव, पृ.१८).

कविसमयांचे काव्यातील उपरिवर्णित महत्त्व व स्थान लक्षात घेऊन राजशेखर (+८९०...९२०), अजितसेन (+९५० :KSS:1983:-27) हेमचंद्र (+१०८८...११७२ - तत्रैव), अरिसिंह व अमरचंद्र (सुमारे +१२५०-तत्रैव), देवेश्वर (सुमारे +१३००...१३२५), विश्वनाथ (+१३००...१३८४), वाग्भट (काव्यानुशासन +१३००...१४००), केशवमिश्र (+१५५०...१६००), कृष्णकवी (+१६०० नंतर) व लोकनाथ त्रिपाठी (कविकण्ठहार +१७१८-६७ :MSP:1988:233-236) यांच्या ग्रंथांच्या आधारे असतोऽपि निबन्धनम्, सतोऽपि अनिबन्धनम्, नियमेन निबन्धनम्, विकल्पेन निबन्धनम् व दुर्घटसङ्घट्टन (तत्रैव, पृ.२३६) या पाच प्रकारांच्या कविसमयांचे विकासाभिमुखी व उत्क्रांतिपर अध्ययन होणे आवश्यक आहे. त्यायोगे काव्यात उत्पन्न होणाऱ्या सौंदर्याच्या आणखी एका प्रबळ घटकाचा उत्तम परिचय होईल.

राजशेखरोत्तरकालीन काव्यशास्त्रकारांनी कविसमयांचे महत्त्व पटवून देण्यासाठी व त्यांचे समर्थन करण्यासाठी पुढील पाच युक्तिवाद केले आहेत: १. कविसमयांमुळे कवींना मार्गदर्शन मिळते, एक प्रकारे कविसमयज्ञान हे कविशिक्षण आहे. २. काव्यातील अलंकार कविसमयानुरोधाने हृदयंगम बनतात. ३. कविसमय अदोष व गुणरूप असतात. कविसमयांच्या विरुद्ध वर्णनेच सदोष ठरतात. ४. कविसमय ध्वनिकाव्याचे उत्तम नमुने होत. ५. कविसमयसंपन्न औचित्यपूर्ण वर्णन रसपरिपोषक असते. (कविसमयमीमांसा : १९६३ : ३३-३७). पाश्चात्यांच्या poetic conventions शी वरील कविसमयांची तुलना करून बघावी.

## (६.२) कविशिक्षा

कविशिक्षा म्हणजे कवींचे शिक्षण. प्राचीन कवीला प्रत्यक्ष काव्यनिर्मितीस सुरुवात करण्यापूर्वी अनेक शास्त्रे, विद्या व कला तसेच लोकव्यवहार यांचे ज्ञान प्रयत्नपूर्वक संपादन करावे लागत असे. त्यायोगे त्याची बुद्धी प्रगल्भ बनून प्रतिभा परिष्कृत होत असे. त्यामुळेच प्राचीन विचारवंतांनी ह्या विषयावर पुढील ग्रंथ लिहिलेले आढळतात : क्षेमेन्द्रकृत कविकण्ठाभरण (+९८०...१०६६), अरिसिंह व अमरचन्द्र यांनी रचलेली काव्यकल्पलता (सुमारे +१२५०), देवेश्वरकृत कविकल्पलता (सुमारे +१३००...१३२५), लोकनाथ त्रिपाठीविरचित कविकण्ठहार (+१७२८...६७ : MSP : 1988 : 233-236) आणि कविभूषण गोपीनाथपात्र (+१७६३ - ibid, 216-17)रचित कविचिंतामणी. यांपैकी क्षेमेन्द्राने आपल्या कविकण्ठाभरणाच्या द्वितीय संधीत कवींना शब्दशः शंभर सूचना केल्या आहेत, त्यांपैकी विशेष उल्लेखनीय अशा : कवीने सरस्वतीच्या

कृपाप्रसादासाठी यज्ञ करावा. प्रथमतः वृत्तपूर्तीचा प्रयत्न करावा, इतर कवींच्या रचना अभ्यासू वृत्तीने वाचाव्यात, समस्यापूर्ती करण्यास शिकावे ; श्रेष्ठ कवींच्या संपर्कात राहावे ; महाकाव्यांचा अर्थ मनात वारंवार घोळवावा; नाटके बघावीत ; संगीताचा आस्वाद घ्यावा; लोकाचाराचे निरीक्षण करून ज्ञान संपादन करावे; कथा- आख्यायिका वाचाव्यात व ऐकाव्यात, इतिहासाचा अभ्यास करावा; सुंदर चित्रांचे अवलोकन करावे; वीर पुरुषांची युद्धे बघावीत; शोकमग्न व्यक्तींचा विलाप ऐकावा; स्मशान-अरण्यादी स्थळांचे दर्शन घ्यावे; नक्षीकाम बघावे; विद्वानांच्या मेळाव्यात विनोदी भाषण करावे; नैसर्गिक स्थित्यंतरांचे अवलोकन करावे; विविध ऋतूंत होणारे बदल न्याहाळावेत; देशी भाषा शिकाव्यात; योग्य शब्दाची निवड व योजना करण्याचे कौशल्य आत्मसात करावे; आपल्या वाङ्मयकृतीवरून वारंवार हात फिरवावा; दुसऱ्या कवींच्या उत्कर्षात आनंद मानावा; स्वतःची प्रशंसा करू नये; पण स्वतःच्या काव्याचे विवरण अवश्य करावे; आपल्या कवितांच्या प्रती दूर देशी राहणाऱ्या सहृदय रसिकांकडे अभिप्रायार्थ पाठवाव्यात; आपल्यावर कोणी टीका केली तर ती सहन करावी; प्रसादगुणयुक्त व संदर्भोचित अर्थसंपन्न काव्य लिहावे; संक्षेपविस्ताराचे कसब अंगी बाणवावे; हाती घेतलेले (सुरू केलेले) काव्य पूर्ण करावे. (क्षेमेंद्रलघुकाव्यसंग्रह : १९६१ : ६८-७०). क्षेमेंद्राने कवीला किती व्यावहारिक व बहुविषयस्पर्शी उपदेश केला आहे ! हा उपदेश प्रत्यक्षपणे आचरणात आणणारा कवी 'रसिकांचा लाडका कवी' झाल्याशिवाय राहणार नाही.

लोकनाथ त्रिपाठीने आपल्या कविकंठहार ह्या दहा अध्यायांच्या ग्रंथात कवींना अनेक गोष्टींविषयी मार्गदर्शन केले आहे. त्याने शुभ्र रंगाच्या ७६ वस्तूंची व काळ्या रंगाच्या ६० वस्तूंची यादी दिली आहे. ग्रंथाच्या दुसऱ्या अध्यायात एकपासून हजाराहून अधिक संख्यांनी निर्दिष्ट होणाऱ्या वस्तूंची सूची सादर केली आहे. नंतरच्या एका अध्यायात विविध आवाजांच्या पशुप्राण्यांची नोंद केली आहे. मग लहान, मोठ्या, थंड, उष्ण, सुखद, दुःखद, पातळ, जाड, कोमल, तीक्ष्ण अशा विविध वस्तूंची यादी पुरवली आहे. पराजित राजाच्या शारीरिक व मानसिक स्थितीचे वर्णन कसे करावे त्याचे दिग्दर्शन केले आहे. अपूर्ण श्लोक पूर्ण करण्याचे उपायही शिकवले आहेत. (MSP : 1988 : 233-36)

कविभूषण गोपीनाथपात्र याने आपल्या कविचिंतामणी ग्रंथाच्या १६ ते २५ ह्या किरणांत कवींच्या आचारसंहितेचा विचार करून त्यांना काही मार्गदर्शनही केले आहे. तदनुसार कवींनी प्रयोगयोग्य व प्रयोग-अयोग्य शब्दांचा विचार करावा, शिवाय काव्य वाद्याच्या साथीवर योग्य रीतीने गाता यावे ह्यासाठी कवीने संगीताचे उत्तम ज्ञान संपादन करावे. काव्याच्या गायनक्षमतेचा विचार मनात बाळगून कवीने काव्यरचना करावी व रसिकांकडून वाहवा मिळवावी. गोपीनाथपात्राने स्वतः संगीतशास्त्रावरील चार ग्रंथ अभ्यासले होते. (MSP : 1988 : 216-17)

एकंदरीने हा एका दीर्घ निबंधाला योग्य असा विषय आहे. पाश्चात्यांनी होतकरू कवींना असे काही व्यावहारिक वा प्रायोगिक मार्गदर्शन केले होते काय ते जिज्ञासूंनी शोधून काढून त्याची वरील

विचारांशी तुलना करून बघावी, म्हणजे पूर्वपश्चिमेची कोठे गाठभेट होते काय ते कळून येईल.

### (६.३) गुण

प्राचीन विचारवंतांच्या मते गुण हे काव्याचे अनिवार्य धर्म होत. पण तरी देखील गुणांचे स्वरूप, त्यांची संख्या, त्यांची स्थिरता-अस्थिरता इत्यादी विविध पैलूंविषयी खूप मतभेद आढळून येतात. असे विवाद्य मुद्दे पुढीलप्रमाणे नमूद करता येतील : गुण हे स्वतंत्रपणे संवेद्य धर्म की दोषांचे विपर्ययरूप किंवा अभावरूप धर्म ? गुण हे काव्याचे कोणत्या दृष्टीने प्रसाधन? गुण हे काव्याबरोबर उपजणारे धर्म असतात काय? त्यांच्यावाचून काव्यात सौंदर्य उत्पन्न होणारच नाही, हे म्हणणे सर्वथा प्रमाण मानावयाचे काय? गुण हे पाठधर्म मानता येतील काय? गुण वास्तविक की भ्रान्त? गुण हे स्थिर की अस्थिर? गुणांची संख्या ३, १०, २०, २४ की किती? गुणांचे प्रकार किती? गुणांचे शब्दगुण, अर्थगुण, शब्दार्थोभयगुण, वैशेषिक गुण असे वर्गीकरण योग्य की अयोग्य? गुणासाठी वैमल्य हा पर्याय वापरणे स्वीकारार्ह की अस्वीकारार्ह? गुणांचे बाह्य, आन्तर असे काही भेद असतात काय? गुणांविषयी असे अनेक प्रश्न का उत्पन्न होतात त्याचा थोडासा खुलासा करू या.

भरताने स्वतंत्र १३ व दोषविपर्ययरूप १० असे २३ गुण मानले आहेत. उद्‌भट, क्षेमेन्द्र, भामह, मम्मट, हेमचंद्र, विद्याधर, विश्वनाथ यांनी ३ गुण मानले आहेत. कुन्तक हा वैचित्र्याचे लावण्य, आभिजात्य, प्रसाद व माधुर्य असे ४ गुण मानणारा आहे. क्षेमेन्द्राने शब्दवैमल्य, अर्थवैमल्य व रसवैमल्य अशा संज्ञा वापरल्या आहेत. साहित्यकौमुदीकार बलदेव विद्याभूषण (*१७०५...१७९५) हा गुणांना स्थिरधर्म मानतो. (MSP : 1988 : 155-56) तर साहित्यभूषणकार रघुनाथदास गुणांना अलंकारांच्या तुलनेत आवश्यक धर्म मानतो. {(अलंकारा) अस्थिरा इति नैषां गुणवद् आवश्यकी स्थितिः। तत्रैव पृ.१११, १२७). विश्वेश्वराने आपल्या चमत्कारचंद्रिकेत 'गुणस्तु श्रुति- माधुर्यम्' असे गुणलक्षण करून एकूण २३ गुण मानले आहेत, पण त्यांची लक्षणे पूर्वसूरींच्या लक्षणांहून वेगळ्या प्रकारे केली आहेत. (चमत्कारचन्द्रिका : 1972 : Part I : 145-56; Part II : 83-95)

वरील तपशीलवार नोंदींवरून हे स्पष्ट होईल की, गुण हा एक अतिशय जटिल व विवाद्य असा विषय आहे. म्हणूनच तो सर्वांगांनी व सूक्ष्मपणे अभ्यासयोग्य ठरतो. गुणांचा शोधक बुद्धीने व सौंदर्यदृष्टीने विश्लेषणात्मक अभ्यास केल्यास तो निश्चितपणे योगदानरूप ठरेल. तशा अभ्यासाला P.C. Lahiri यांच्या Concept of Riti and Guṇa in Sanskrit Poetics (in their historical development), (Dacca, 1937) या ग्रंथाची खूप मदत होऊ शकेल.

*(उर्वरित भाग पुढील अंकात)*

# भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१५)
# ओरिसा शैलीची देवालये (अ)

डॉ. र. पु. कुलकर्णी

नागर व द्राविड शैलीच्या प्रासादांची माहिती आपण पाहिली. द्राविड शैलीत बांधलेले तंजावर येथील बृहदीश्वराचे देवालय, नागर शैलीतील खजुराहो येथील देवालये, तसेच अंबरनाथ येथील शिवालयाची माहितीही आपल्याला झालेली आहे. नागर पद्धतीने बांधलेली देवालये महाराष्ट्र गुजराथ, सौराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश इत्यादी राज्यांमध्ये आढळतात. दक्षिण भारतातील राज्यांमध्ये म्हणजे आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू येथील देवालये द्राविड शैलीत निर्माण केलेली आहेत. या शैलीची अर्थात नागर प्रासादाच्या शैलीशी जवळीक आहे.

ओरिसा शैलीच्या देवालयांची माहिती देणारे दोन उत्तम ग्रन्थ उपलब्ध आहेत: भुवनदीप व शिल्पप्रकाश. भुवनदीपात देवालयांच्या निरनिराळ्या अवयवांची, त्यांच्या वेगळ्या वेगळ्या प्रकारांनुसार मापे दिली आहेत. शिल्पप्रकाशात या देवालयांचे अलंकरण कसे करतात याबद्दल बरीच चांगली माहिती दिली आहे.

ओरिसा शैलीची प्रमुख देवालये म्हटली की आपल्या डोळ्यांसमोर येतात ती भुवनेश्वर येथील राजराणी, परशुरामेश्वर, रामेश्वर, भगवती तसेच पुरी येथील पुरुषोत्तमाचा भव्य प्रासाद आणि ज्याला प्रासादोत्तम म्हणता येईल असे कोणार्क येथील सूर्यमंदिर. या सर्व मंदिरांच्या शिखराची उंची अधिष्ठान व भिंत यांच्या एकत्रित उंचीपेक्षा दुपटीने किंवा त्याहून जास्त असते. तसेच हे शिखर कमळकळीच्या आकाराचे नसते. नागर पद्धतीच्या देवालयाचे शिखर जसे वर्तुळखण्डाने काढले जाते तसे येथे नाही. शिखराच्या उंचीचा बराचसा भाग सरळसोट उभा असतो व शिखराच्या अगदी वरच्या टोकाला त्याची रुंदी एकदम कमी होते. या शिवाय ओरिसा शैलीच्या देवालयाच्या अधिष्ठानाचे संकल्पचित्र, भिंतीवरील नक्षी व तिचे तसेच शिखराचे अलंकरण हे नागर पद्धतीच्या देवालयापेक्षा काहीसे वेगळे असतात.

नागर किंवा द्राविड शैलीच्या प्रासादांप्रमाणे ओरिसा शैलीच्या देवालयांचे सहा प्रमुख विभाग (षड्वर्ग) करता येतात. ते म्हणजे १) अधिष्ठान २) भिंत अथवा खांब ३) प्रस्तर ४) शिखर ५) गल किंवा ग्रीवा व ६) कळस.

अधिष्ठान

प्रासादाच्या अधिष्ठानाच्या किंवा उपपीठांच्या उंचीबाबत शिल्पप्रकाश या ग्रंथात नियम दिला आहे की उपपीठ ते कळसापर्यंतच्या उंचीचे १९ भाग करावेत तेव्हा उपपीठाची उंची एक भाग असते, म्हणजेच उपपीठांची उंची देवालयाच्या उंचीच्या १/१९ असते.

उपपीठांचे पाच प्रकार आहेत कूर्म, सिंह, कुंभिका, कणी व विथी. कूर्मपीठ तीन थरविभाग मिळून होते. खालचा थर ज्या आकाराचा आहे त्याच आकाराचा वरचा थर ठेवावा. त्या दोघांमधील थरविभाग कासवाच्या पाठीच्या आकाराचा असतो. पाठीच्या उंचीचे चार भाग केले तर खालचा व वरचा थर प्रत्येकी एक भाग उंचीचे असून कूर्मथराची उंची दोन भाग असते.


सिंहपीठात खालचा व वरचा थर हे सिंहासनाला असे असतात त्याचप्रमाणे ठेवतात मधला थर भिंतीसारखा असतो.

कुंभिका प्रकारच्या पीठात खाली व वरती प्रत्येकी दोन थर असतात व त्यांच्या मधला थरविभाग कुंभाच्या आकाराचा असतो.

कणिपीठ कुंभिकापीठाप्रमाणेच असते परंतु तेथे घटाच्या जागी कणिकेचा थरविभाग असतो.

ज्या उपपीठावर कोणतेही नक्षीकाम केलेले नसते आणि ज्याला पायाभूत थरविभाग नसून जे केवळ जमिनीवर आधारलेले असते, व शिवाय जे केवळ मजबूत पायासारखे असते त्याला वीथिपीठ म्हणतात.

याहून वेगळ्या प्रकारच्या आणखी एका उपपीठाची माहिती शिल्पप्रकाशात दिली आहे. यात पाच थरविभागांपैकी सगळ्यात खालच्या थराला खुर म्हणतात. पट्ट आणि पद्म यांनी मिळून हा थरविभाग होतो. त्यावर कुंभाचा थरविभाग असतो. त्यावरील तिसरा थर पट्टाचा असून चौथा कणिकेचा असतो. कणिकेवर पाचवा थरविभाग पुन्हा पट्टाचा असतो. खुर आणि कुंभ यांच्या संधीपाशी अंतर्गमन बरेच असते त्यामुळे त्या दोन्ही थरांचा एकूण आकार डमरूसारखा दिसतो (आकृती १ आ). आकृती १ मध्ये या पंचकर्म प्रकारच्या उपपीठाचा आणखी एक उपप्रकार दाखविला आहे.




आकृती १ - देवालयाचे उपपीठ

पट्टाचे उंचीत जर तीन भाग केलेत तर मधल्या भागी वेलीची मनोहर नक्षी असते. खालच्या पट्टाच्या खालच्या भागापासून कुंभाच्या मध्यभागापर्यंत चाफ्याचे पान कोरलेले असते. कणिकेवर देखील मध्यभागी वेलीची नक्षी असते.

## भिंत


ओरिसा शिल्पशैलीतील प्रासादांचे तीन प्रमुख प्रकार आहेत: रेखा, भद्र व खाकरा. गौरीय हा प्रासादाचा चौथा प्रकार वरील तीन प्रकारांइतका लोकप्रिय नाही व त्याविषयी फारशी माहिती ओरिसा शैलीच्या देवालयांची माहिती देणाऱ्या शिल्पशास्त्राच्या ग्रंथात उपलब्ध नाही. रेखा, भद्र व खाकरा या तिन्ही प्रासादप्रकारांची कल्पना आकृती २ ते ५ वरून येऊ शकेल. गौरीय प्रासादाचीही आकृती तेथे दिली आहे. या आकृतीत 'बाड' म्हणून जो अवयव दाखवला आहे तोच भिंतीचा भाग. उडिया भाषेत भिंतीला 'बाड' म्हणतात. या बाडाचे तीन किंवा पाच थरविभाग असतात. त्यांना अनुक्रमे त्रिअंग बाड व पंचांग बाड म्हणतात. त्रिअंग बाडांत पाभाग, जंघा व वरण्ड असे तीन भाग असतात, तर पंचांग प्रकारच्या बांडात पाभाग, तलजांघ, बन्दना, उपरबांघ व वरण्ड असे पाच भाग होतात. आकृती २ अ,आ मध्ये हे थरविभाग दाखविले आहेत.



आकृती २ -


(अ) त्रिअंग रेखा प्रासाद (आ) पंचांग रेखा प्रासाद

प्रासादाची रुंदी क्ष असेल तर रेखा प्रकारच्या प्रासादाच्या भिंतीची उंची १$^{1/2}$ क्ष असते. समजा प्रासादाची उंची १६ मीटर आहे तर बाडाची उंची २४ मीटर असेल. पंचांग प्रकारच्या बाडात पाभागाची उंची ६ मीटर, तळजांघेची उंची ५ मी. बंधना २ मीटरची, उपरजांघेची ५ मीटर, व वरण्डाची उंची ६ मीटर ठेवतात. एकूण उंची २४ मीटर येते. पाभाग तळजांघ: बंधना: उपरजांघ वरण्ड यांचे प्रासादाच्या रुंदीशी येणारे गुणोत्तर ३/८, ५/१६, १/८, ५/१६, ३/८ या प्रमाणात असते. या गुणोत्तरात थोडे कमी जास्त प्रमाणात करता येते व त्याप्रमाणे प्रासादाच्या प्रकारातही बदल होतो.




आकृती ३ - भद्र प्रासाद

भद्र प्रकारच्या प्रासादाच्या (आकृती ३) बाडाची उंची प्रासादाच्या रुंदीइतकी असते. परंतु हा सर्वसाधारण नियम झाला. बाडाची उंची व प्रासादाची रुंदी यांचे गुणोत्तर यापेक्षा कमी होऊ शकते व त्यावरून भद्र प्रकारच्या प्रासादाचे अनेक उपप्रकार होतात.





आकृती ४ - खाकरा प्रासाद (पार्श्वच्छंद)

खाकरा प्रकारच्या मंदिरात (आकृती ४) प्रासादाची रुंदी क्ष असेल तर बाडाची उंची १९/१६ क्ष किंवा ११/८ अशी असते. येथे हे लक्षात घ्यावयास हवे की रेखा व भद्र प्रकारचे प्रासाद चौरसाकृती असतात, तर खाकरा प्रकारचा प्रासाद आयताकृती असतो.


ओरिसा शैलीच्या देवालयाच्या शिखराची उंची बरीच असल्याने भिंतीची जाडी खूपच जास्त ठेवतात. कोष्ठक १ मध्ये काही प्रसिद्ध देवालयांच्या भिंतीच्या

जाडीची माहिती दिली आहे. त्यावरून दिसून येते की भिंतीची जाडी व प्रासादाची रुंदी यांचे गुणोत्तर १/३ ते १/४ यांच्या दरम्यान असते.



आकृती ५ - गौरीय प्रासाद

बाडाच्या या पाच निरनिराळ्या थरविभागांचे बाहेरून अलंकरण करतात. भिंत आतल्या बाजूने भूषणविरहित असते. सगळ्यात खालचा थरविभाग पाभाग याचे थरविभाग त्याच्या खाली असलेल्या उपपीठाप्रमाणेच असतात (आकृती ६ अ) या निरनिराळ्या थरविभागांची




आकृती ६ - भिंतीवरील अलंकरण

नावे दिली आहेत. खुरा, कुंभ, पट्ट, कणी व वसन्त. वसन्त हा पट्टाचाच प्रकार असतो पण या प्रकारचा पट्ट, वेली, फुले वगैरेंच्या नक्षींनी विशेष शोभिवंत केलेला असतो, म्हणून त्याला वसन्त म्हणावयाचे.

तळजांघेवर नरविराल, गजविराल वगैरे मूर्ती कोरलेल्या असतात. त्यांना 'कौतूहल' म्हणतात. नरविराल म्हणजे तोंड हरिणाचे व शरीर मात्र वाघाचे किंवा सिंहाचे असते. तसेच गजविराल म्हणजे तोंड हत्तीचे व शरीर सिंहाचे असते. हे प्राणी नेहमीपेक्षा विचित्र तऱ्हेचे असल्याने त्यांना कौतूहल म्हटले आहे. याशिवाय 'खाकरमुंडी' म्हणजे खाकरा प्रकारच्या देवालयाच्या प्रतिकृती देखील तळजांघेवर खोदतात. आकृती ६ आ मध्ये 'खाकरमुंडी' दाखविली आहे. तिचे थरविभाग आहेत. पाद-२, जांघ-४ भाग, पिडा-१ भाग खाकरा -४ भाग व कलश-१ भाग

**कोष्टक १ +**

ओरिसा शैलीच्या प्रासादांचा भिंतीची जाडी(माप फुटात)

| देवालयाचे नांव | प्रासादाची उंची |  | भिंतीची जाडी | म/क्ष |
|---|---|---|---|---|
|  | बाहेरील माप (क्ष) | आतले माप |  | (म) |
| भगवती | ३८X३८ | १३X१३ | १२ १/२ | ०.३२ |
| रामेश्वर | ३४X३४ | १६X१६ | ९ | ०.२६४ |
| परशुरामेश्वर | २०X२० | ११X९ | ४ १/२ | ०.२५५ |
|  |  |  | ५ १/२ | ०.२७५ |
| यमेश्वर | २२X२२ | १२X१२ | ५ | ०.२३ |
| कपिलेश्वर | २०X१६ | ९X९ | ५ १/२ | ०२७५ |
|  |  |  | ३ १/२ | ०.२० |
| राजाराणी | ३२X२५ | १२X१२ | १० | ०.३१ |
|  |  |  | ६ १/२ | ०.२६ |
| पुरुषोत्तम | ७३X७३ | २९X२९ | २२ | ०.३०१ |
| सर्‍दिऊळ | २४X२२ | १२X१२ | ६,५ | ०.२५ |
|  |  |  |  | ०.२२७ |
| सोमेश्वर | २३X२३ | ११X११ | ६ | ०.२६ |
| अनंतवासुदेव | २६X२६ | १६X१४ | ५,६ | ०.१९४ |
|  |  |  |  | ०.२३ |

+ राजेन्द्र मित्र यांच्या

The Antiquity of Orissa या पुस्तकातून

बन्धना हा बाढाच्या उंचीच्या जवळजवळ मध्यभागी असलेला अवयव. त्यात तीन किंवा पाच थर असतात. तीन थरांतील विभाग आहेत वरण्डि, नोलि व वसन्त व पांच थरांची नावे आहेत, वरण्डि, नोलि, पट्टा, कणी आणि वसन्त (आकृती ६)


उपरजांघेवर कुमारी, किंवा ज्यांना अलसा कन्या म्हणतात अशा तरुण स्त्रियांच्या निरनिराळ्या मुद्रांमधील मूर्ती खोदतात. याशिवाय येथे पिढामुण्डीची नक्षी देखील कोरतात. पिढामुण्डी म्हणजे भद्रप्रासाद. पायऱ्या पायऱ्यांनी याचे शिखर बनलेले असते. या पायऱ्यांना पिढा म्हणतात. व मुण्डी म्हणजे शिखर, तेव्हा पिढांनी ज्याचे शिखर बनते ते पिढामुण्डी. पिढामुण्डीच्या उंचीचे १२ भाग केले तर पाद-२ भाग, जांघ-४ भाग, पिढा-४ भाग, मस्तक - १ भाग व कलश १ भाग असे थरविभाग असतात. (आकृती ६ ई)

सर्वांत वरचा अवयव आहे 'वरण्डा' चा (आकृती ६ ड) याचे १० थर विभाग असतात. या थरविभागांची नावे आहेत: वरण्डि, फेणी, पट्टा, कणी, पटा, नोलि, पटा कणी, वसंत व पट्टा. भिंतीवर फुले, वेली, यांच्या नक्षींचे असंख्य प्रकार कोरतात. शिल्पप्रकाश या शिल्पशास्त्रावरील ग्रंथात त्यांच्या ११ प्रकारांचे वर्णन केले आहे. या नक्षींची नावे आहेत १) कुंचिता लता २) हंसा ३) वर्तुळा ४) आगमा ५) रतिकेरा ६) सगुम्फा ७) कुटिला ८) समभागिका ९) पल्लवा १०) कलियुक्ता व ११) मेद्या. यातील काही नक्षींची कल्पना त्यांच्या नावावरून येऊ शकेल. हंसा प्रकारच्या नक्षीत वेलीमध्ये गुंफलेले हंस असतात, तर वर्तुळा प्रकारात वेलींचे देठ वर्तुळाकार रचलेले असतात. पल्लवा प्रकारात पानांची नक्षी असते तर कलियुक्त प्रकारच्या नक्षीत तऱ्हेतऱ्हेच्या कळ्यांचे प्राबल्य असते. याहून अधिक माहिती हवी असल्यास ती मूळ शिल्पप्रकाश या ग्रंथातून वाचावयास हवी.

अलसा कन्यांचे १७ प्रकार वर्णिले आहेत. स्त्रीशिवाय असे घर, स्त्रीशिवाय जशी रतिक्रीडा त्याचप्रमाणे स्त्रीमूर्तीशिवाय देवालय ही सर्व सारखीच. सर्व अलंकारांनी भूषविलेली अशी मनोहर रमणी करावी. अलसा कन्यांच्या मूर्ती गवाक्ष, शिखर, त्याशिवाय मुखशालेला शोभविन्यासाठी तसेच गर्भगृहाच्या भद्रावर अशा ठिकाणी कोरतात. या मूर्तींना नारीबन्ध असेही म्हणतात. अलसा कन्यांची नावे आहेत १) अलसा २) तोरणा ३) मुग्धा ४) मानिनी ५) डालमालिका ६) पद्मगंधा ७) दर्पणा ८) विन्यासा ९) ध्यानकर्षिता १०) केतकी ११) मातृमूर्ती १२) चामरा १३) गुंठना १४) नर्तकी १५) शुकसारिका १६) नूपुरपारिका १७) मर्दला. आकृती ७ मध्ये यातील काही


दर्पणा


दर्पणा


पद्मगंधा


गुठना


डालमालिका


मर्दला

आकृती ७ - अलसा कन्या

अलसा कन्या दाखवल्या आहेत. त्यांच्या नावांप्रमाणे त्यांची मुद्रा असते. आळस देत असलेली ती अलसा कन्या तिच्या दोन्ही हातांची बोटे एकमेकांत गुंतलेली असून ते डोक्याच्या वर नेलेले असतात. तोरणा ही उत्कृष्ट तोरणाखाली उभी असलेली दाखवितात. मुग्धा व मानिनी या आपला हा भाव चेहऱ्यावर व शरीराच्या एकूण ढबीने दाखवितात. हातात वेलीची फांदी घेतलेली ती डालमालिका, कमळाच्या फुलाचा वास घेत आहे असे

(पान क्र. ३२ वर)

# वैद्यक, परामानसशास्त्र आणि आध्यात्मिकता

श्री. व. वि. अकोलकर

पाश्चिमात्य वैद्यक चित् अथवा चैतन्याची (consciousness) दखल घेताना दिसत नाही. 'कृत्रिम बुद्धिमत्तेचे' (artificial intelligence) तज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध असलेले Marvin Minskey तर मेंदूस मांसाचा बनलेला संगणकच समजतात.

व्यक्तीच्या एकूण एक क्रियांचे मूळ मेंदू हेच आहे असे वैद्यक शास्त्राच्या विद्यार्थ्यांवर बिंबवले जात असते. आजकाल पाश्चिमात्य वैद्यकात, 'चित्' अथवा चैतन्य हा शब्द जवळजवळ निषिद्ध गणला जात असल्यासारखे दिसते. हॉवर्ड यांच्या The Mind New Science या बोध-मानसशास्त्र (cognitive psychology) या ग्रंथाच्या सूचीमध्ये देखील consciousness हा शब्द नाही. पाश्चिमात्य वैद्यकात, जिथे 'चित्' ला स्थान नाही तिथे स्थलकालाची मर्यादा नसलेले आत्मतत्त्व मानणे दूरच राहिले. दूर अंतरावरून 'मानस संक्रमण' होते व दूर अंतरावरून रुग्णावर उपचारही करता येतात, याचा प्रयोगसिद्ध पुरावा वैद्यकशास्त्राने विचारात घेणे आवश्यक आहे. वैद्यकशास्त्रात 'चित्' (चैतन्य) ला स्थान न देण्यात आल्यामुळे, व्यक्ती स्वतःच स्वतःला सहाय्य करू शकेल आणि प्रकृती सांभाळण्यासाठी व बिघडलेली प्रकृती पूर्ववत करण्यासाठी, भावना व अभिवृत्तीच्या बाबतीत काहीतरी करू शकेल या कल्पनेस पाश्चिमात्य वैद्यकात वावच राहिला नाही. 'चित्' विषयक वाद संपुष्टात आला आहे असे काही वैज्ञानिकांना वाटते पण तो संपलेला नाही हे अव्वल दर्जाच्या वैज्ञानिकांच्या विधानांमध्ये गर्भित आहे. Neils Bohr हे विख्यात पदार्थ वैज्ञानिक लिहितात, 'पदार्थ विज्ञानामध्ये अथवा रसायन विज्ञानामध्ये काही सापडत नाही की ज्याचा दूरान्वयेही संबंध 'चित्' शी, चेतनाशी लावता येईल.' त्यात गर्भित आहे की या विज्ञानाच्या हाती न लागणाऱ्या अशा काही गोष्टी आहेत. डॉ. डी. एस. कोठारी यांनी म्हटले आहे की, 'भौतिकापासून सुरुवात करून मागेमागे गेल्याने चैतन्याची (चित्) वासलात लावता येणार नाही'. Werner Heisenberg यांनी म्हटले आहे की, "क्वांटममेकॅनिक्स मधून चित् (चेतना) कसे उत्पन्न होऊ शकेल हे मला कळत नाही."

पाश्चिमात्य वैद्यकाने १८६० नंतर वैज्ञानिक दृष्टिकोन अंगिकारला खरा, परंतु पदार्थवैज्ञानिकांच्या 'अचूकता आणि प्राक्कथनीयता (predictability) या आदर्शावरच वैद्यमंडळींनी भर दिला आहे. १९४० च्या सुमारास त्या दृष्टिकोनात बदल झाला. काहीसे कुरकुरत का होईना वैद्यकाने 'मन' स्वीकारले व जठरव्रण, उच्चरक्तदाब, अर्धशिशी इ. विकार कधीकधी मनोमूलक अथवा मनोकायिक (psychosomatic) असू शकतात ही मीमांसा मान्य झाली. Arteriosclerosis ह्या हृदयविकारामुळे तर विकार उद्‌भवण्यात मनाचा हातभार मान्य करणे भागच पडले. धूम्रपान, रक्तातील कोलेस्ट्रॉलची वाढ, उच्च रक्तदाब, मधुमेह यांपैकी एखादे अथवा ही सर्व हृदयविकारास कारणीभूत असतात, हे खरे नसल्याचे लक्षात आले. कारण वरीलपैकी कोणतेच कारण नसताना हृदयविकाराचा पहिला झटका आल्याच्या उदाहरणांकडे १९७१ पासून लक्ष गेले. National Institute of Health ने डॉ. James Muller यांना असे आढळले की हृदयविकाराचे बहुतेक झटके सोमवारी सकाळी म्हणजे कामावर जाण्याच्या वेळी येतात व कामात असंतोष, काम स्वतःला अर्थशून्य वाटणे, कामात स्व-रस, स्वारस्य न वाटणे यामुळे हे झटके येतात. कामाचा ताण कारणीभूत असतो हे सर्वस्वी सत्य नाही; कारण कामाचा ताण असूनही शंभर वर्षे जगलेली माणसे आढळतात कामात अर्थ वाटणे हे आरोग्यास उपायकारक असते म्हणून हल्ली डॉक्टर अशी उपाययोजना करतात की जिला 'अर्थ-उपचार' (meaning therapy) म्हणता येईल. लवकरच तिसरे युग, अस्थानीय वैद्यकाचे (nonlocal medicine) युग सुरू होईल असे गृहीत धरण्यास हरकत असू नये.

आतापर्यंत अशी कल्पना होती की मन हे मेंदूशीच निगडित असते व मेंदू हा शरीराशी संबद्ध असतो तसेच मन हे वर्तमानकाळाचे कार्य करते. परंतु एका व्यक्तीचे मन तिच्या मेंदूनेच सीमित नसून शिवाय व्यक्तीच्या मनास वर्तमान कालाची मर्यादा नसण्याची शक्यता आहे. एका व्यक्तीच्या मनाचा परिणाम जसा तिच्या स्वत:च्या शरीरावर होणे आणि तो दूर अंतरावरून देखील होणे संभवनीय आहे. ह्या संभवनीयतेस भरपूर पुरावा देखील उपलब्ध आहे. William G. Braud व Marilyn Sehlitz यांनी एकमेकांपासून दूर अंतरावर असलेल्या व्यक्ती ऐंद्रिय पातळीवर संपर्क नसताना समान स्वरूपाच्या शारीरिक प्रक्रिया अनुभवू शकतात काय हे Mind Science Foundation मध्ये वाचण्यांद्वारा अभ्यासले आहे. प्रयोगशाळेत बसलेल्या प्रयुक्तांच्या मनातील विचार, मनासमोर आणलेली प्रतिमा (image) व दृश्ये दुसऱ्या व्यक्तीचे वर्तन प्रभावित करू शकतात - हे प्रयोगान्ती दिसून आले आहे. आणखी एक गोष्ट दृष्टोत्पत्तीस आली आहे ती म्हणजे, ज्या दोन व्यक्तींमध्ये ऐंद्रिय पातळीवर संपर्क तोडून टाकलेला असतो त्या वेळी प्रयोगापूर्वीच्या त्यांच्या मस्तिष्क विद्युत आलेखाच्या (EEG) बाबतीत यत्किंचितही सहबंधन (correletion) नव्हते. परंतु त्यांना सांगितले की, "आता तुम्ही एकमेकांशी एकानुभवात्मक (empathic) संपर्क प्रस्थापित करून भावनिक पातळीवर एकत्र या व परस्परांची हृदये एकत्र बांधली गेल्यासारखे तुम्हास वाटले की त्यावेळी EEG उपकरणाचे बटन दाबा." त्यांनी असे केल्यावर त्यांचे भावनिक आलेख एकमेकांशी मिळत असल्याप्रमाणे आले. या प्रयोगाची पुनरावृत्ती (replication) निदान तीन प्रयोगशाळांमध्ये झालेले आहे. Psychic healing करणारे जवळजवळ सर्व जणही सांगतात की दूर अंतरावरून रुग्णावर उपचार करावयाचे असतील तर उपचारकाच्या मनात रुग्णाविषयी कळवळा (care) असावा लागतो. उपचारकाने रुग्णाच्या बाबतीत एकभाव (empathy) अनुभवला पाहिजे, असे झाले की त्यावेळी उपचारक व रुग्ण यांचे मस्तिष्क आलेख घेतले तर त्या आलेखामध्ये महत्त्वाचे काही तरी आढळण्याचा संभव आहे असे अभ्यासकांना वाटते.

रोगाचे निदान व उपचार या दोन्ही गोष्टी डॉक्टर मंडळी करतात. ह्या संदर्भात वाचकांच्या नजरेस आणून देण्यासारखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे Springfield येथील मज्जाशल्य चिकित्सक डॉ. Norman Sheely यांच्या New Hampshire मधील Walpo गावी असलेल्या त्यांच्या खोलीत बसलेल्या रुग्णाचे नाव व जन्मतारीख दूरध्वनीवरून श्रीमती Carolyn Myss या सायकिक हीलरला सांगत व तेथून त्या रोगनिदान करीत, १०० पैकी ९३ वेळा बाईंनी केलेल निदान अचूक असल्याचे आढळले. Norman Sheely : Creation of Health. प्रार्थनेचे व सद्भावनेचे बळ हे देखील डॉक्टर मंडळींनी विचारात घेण्यासारखे आहे. सॅन्फ्रान्सिस्को येथील रुग्णालयातील हृदयविकार विभागातील प्रार्थनागटावर आश्चर्यकारक परिणाम झाल्याचे डॉक्टर Randolph Byrd यांनी Southern Medical Journal मध्ये प्रसिद्ध केले आहे. माणसांच्याच नव्हेतर जीवाणू, उंदीर, कोंबड्यांची पिल्ले व अन्य प्राणी यांच्यावर सहेतुक प्रार्थनेचा काही परिणाम दूरवरून घडून येतो असे दर्शविणारे व प्रयोगाच्या निकषांना उतरणारे असे शेकडो प्रयोग आढळतील.

प्रार्थनेचे परिणाम मोजमाप करता येण्यासारखे आहेत. D. Scott Rogo यांच्या New Techneiques of Inner Healing (1992) New York या ग्रंथात प्रार्थनेच्या सामर्थ्याविषयी वैज्ञानिक अभ्यास नमूद केलेले आहेत.

चित्स्वरूप असलेल्या मनाला अवकाशाची मर्यादा नाही ही गोष्ट मानससंक्रमणाच्या आपातत: घडलेल्या घटनांची उदाहरणे दर्शवितात. संशयवादी त्यामध्ये केवळ योगायोगाखेरीज काही नाही असे म्हणतील, परंतु अशा घटनांच्या बाबतीत आंतरिक सुसंगती आढळते व म्हणून 'केवळ योगायोग' असे म्हणून त्यांची संभावना करता येणार नाही. ती आंतरिक सुसंगती म्हणजे अतिदूर असलेल्या त्या दोन व्यक्तींमध्ये प्रेमबंध असतो. उदा. तोंडावर कशाचा तरी स्फोट झाल्यागत होऊन वेदना होऊ लागलेल्या स्त्रीला डॉक्टरांनी, काही एक झालेले नाही असे सांगून घरी पाठवून दिले व घरी येताच तिला ब्रिटिश युद्धखात्याकडून निरोप मिळाला की लष्करी पाणबुडी बॉबस्फोट होऊन फुटली, व तिच्या मुलासह सर्वजण बुडाले. मूल दूरच्या तळ्यात

घटांगळ्या खाऊ लागले त्याचवेळी मातेला घुसमटल्यासारखे होऊ लागले; अशा उदारणांसारख्या घटनांमध्ये आंतरिक सुसंगती आढळते.

दूर अंतरावरून मानससंक्रमण होऊ शकते याचा प्रायोगिक पुरावाही आहे. १४ मार्च १९२५ च्या रात्री पॅरिस येथे Rene Wareollier व न्यूयॉर्क येथे दोन आधी ठरवून घेतलेल्या वेळी बसलेल्या, वॉलकोबिअर यांच्या मनात काचेच्या नरसाळ्याची प्रतिमा आली व तिकडे न्यूयॉर्क येथे प्रयुक्तने कढ्या असलेला काचेचा पेला रेखाटला हा प्रयोग प्रसिद्ध आहे.

शांत व शिथिल अवस्थेत बसलेल्या व्यक्तीचे मन दूर अंतरावरील घटनांपर्यंत पोहचू शकते हे Stanford Research Institute मधील 'Remote Viewing' च्या प्रयोगांद्वारे सिद्ध झाले आहे.

सचित्र माहितीसाठी पहा: व. वि. अकोलकर: परामानसशास्त्र (१९९२) Princeton येथे Brenda Dunne व Rober John यांनी 'Remote Sensing' चे ३०० हून अधिक प्रयोग, व त्यासारखेच इतर अनेक प्रयोगशाळांमध्ये करण्यात आलेले प्रयोगही मनाला अवकाशाची मर्यादा नसल्याचे दर्शवितात.

**चित्स्वरूपी मनास कालाचीही मर्यादा नसते.**

घटना प्रत्यक्ष घडण्यापूर्वीच जागेपणी अथवा स्वप्नरूपाने कळली अशी किती तरी उदाहरणे नमूद आहेत. 'योगायोग' म्हणून ती धुडकावून लावणे योग्य ठरणार नाही, कारण पूर्वज्ञान अनागतज्ञान-विषयक प्रयोगसिद्ध पुरावाही आहे. संप्रेषित करण्यासाठी म्हणून संगणकाच्या साहाय्याने तीन दिवसानंतर निवडले जाणारे चित्र, प्रेषक म्हणून बसण्याच्या व्यक्तीच्या मन:चक्षूसमोर तीन दिवस आधीच तपशीलवारपणे आले व ग्रहणकर्त्या प्रयुक्ताच्या मनापुढेही आले असे Princeton येथील प्रयोगात आढळून आले आहे.

**प्रमुख संदर्भ :**

Internal Medicine तज्ञ Dr. Larry Dossey (न्यू मेक्सिको) यांनी १९९२ मध्ये Foundation For Research on the Nature of Man (ERNM) मध्ये केलेले भाषण. वैज्ञानिकांना स्वीकार्य अशा चौकटीत Holistic Health Movement नामक चळवळ ते बसवीत आहेत.

• • •

(पान क्र. २९ वरून)

**भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१५)**

**ओरिसा शैलीची देवालये (अ)**

दाखवलेली कुमारी स्त्री पद्मगंधा; आरशात स्वत:चे रूप न्याहाळीत आहे अशी दर्पणा. विन्यासा कन्येचा एक हात न्यास मुद्रेत, कच्छपिकाकृती म्हणजे लहान कासवाप्रमाणे दिसणाऱ्या मुद्रेत असतो. जणू काही जप करीत आहे, ध्यानात मग्न झालेली अशी ध्यानकर्षिता असते. ती लावण्यवती असून उत्कृष्ट व बहुमोल वस्त्र नेसलेली असते. तसे पाहू जाता सर्वच अलसा कन्या सुंदर असतात. परंतु हिच्या बाबतीत तिच्या लावण्याचा मुद्दाम उल्लेख केलेला आहे. केतकीभरणा कन्येच्या हातात केतकीचे (केवड्याचे) पान असते व श्रीकृष्ण पावा वाजविताना जशी पायाची आढी घालून उभा राहिलेला दाखवतात, तशीच पायाची आढी हिने घातलेली असते. मातृमूर्तीच्या कडेवर मूल असते. हातात चामर धरलेली स्त्री ती चामरा, देवीची सेविका. याक प्राण्याच्या झुबकेदार शेपटीपासून चामर तयार करतात. सर्व शरीर वस्त्राने (अवगुंठनाने) झाकून घेतलेल्या स्त्रीला गुंठना म्हणतात. ही लाजाळू असल्याने तिचे मुख समोर नसून तिची पाठ समोर दाखवितात. नृत्याच्या मुद्रेत असलेली कुमारी ती नर्तिका, व पोपट आणि मैना यांच्याशी गुजगोष्टी करीत असलेली ती शुकसारिका तिच्या उजव्या हातामध्ये पोपट किंवा मैना किंवा दुसरे अनेक प्रकारचे पक्षी दाखवितात. नूपुरपादिकेचा डावा पाय सरळ उभा असतो. व उजवा पाय वर उचललेला असतो. त्या पायाच्या नूपुरांच्या माळेपाशी तिचा डाव हात असतो. दोन्ही हातांनी मृदंग वाजविण्यात गुंग झालेली कन्या ती मर्दला. मर्दला कन्येचे रूप इतके जिवंत हवे की जणू काही दोन्ही हातांनी तिने निर्माण केलेला पखवाजाचा ध्वनी ऐकू येत आहे, अशी ही मूर्ती असावी.

प्रस्तर- वर वर्णन केलेल्या भिंतीचा सर्वात वरचा थर विभाग वरण्ड हाच या देवालयाचा प्रस्तराचे काम करतो.

रेखा, भद्र व खाकरा प्रकारच्या देवालयांचे शिखर, मस्तक व कळस तसेच मुखमंडप यांची माहिती पुढील लेखात पाहू.

• • •

# 'माझा मीच घडलो' - श्री. श्रीपाद करंदीकर

सौ. मैत्रेयी शेवडे

विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीपाद करंदीकर यांच्या आत्मचरित्राच्या 'माझा मीच घडलो' या शीर्षकातून त्यांचा जीवनआलेख डोळ्यासमोर येतो. कोणाच्याही आधाराशिवाय, पाठिंब्याशिवाय व मार्गदर्शनाशिवाय स्वत:च स्वत: घडत जाणं कठीणच परंतु त्यातही आनंद आहे. आणि त्या आनंदाचा लाभ श्री. करंदीकर, ज्यांना लोक प्रेमाने अण्णा म्हणतात, त्यांना नक्कीच झाला असेल. वशिल्याच्या शिडीने चढत जाणाऱ्या माणसाला सर्वात वरच्या पायरीवर पोचल्यावर कदाचित भोवळ येत असेल, त्याचा आत्मविश्वास डळमळीत होत असेल, परंतु जो स्वत:च स्वत:चा घडत जातो, चढत जातो त्याला जरी तो शिडीच्या शेवटच्या पायरीवर नसेल, परंतु जेथे तो उभा असतो तेथे आत्मविश्वासाने उभा राहू शकतो. मागे वळून बघितल्यावर त्याला भोवळ येत नाही तर समाधानाने, तृप्ततेने त्याचं मन भरून येतं आणि हाच आत्मविश्वास, हीच तृप्तता अण्णांच्या ठायी दिसून येते. सुदृढ शरीरात सुदृढ मन असतं असं म्हणतात पण मला तर वाटतं ज्याचं मन सुदृढ असेल त्यालाच सुदृढ शरीर लाभू शकतं. अण्णांना सुदृढ शरीरयष्टी लाभली आहे त्याला केवळ दैवयोग म्हणता येणार नाही. लहानपणापासूनची त्यांची खेळाची आवड, वक्तशीरपणा, व्यवस्थितपणा, सामाजिक बांधिलकी आणि मनाचा चांगुलपणा, निर्मलता ह्या गोष्टींचा त्यात सिंहाचा वाटा आहे. आत्मचरित्र वाचताना, आत्मचरित्र लिहिणारा हा कोणीतरी फार मोठ्या पदावरचा असावा किंवा त्याला प्रचंड लोकप्रियता, प्रसिद्धीचा झोत लाभलेला असावा अशी सर्वसाधारण समजूत असते. परंतु तुमच्याआमच्यात वावरणाऱ्या एखाद्या सामान्य माणसाच्या चरित्रातही अनेक उद्बोधक गोष्टी असू शकतात. वाचणाऱ्यांनी त्यापासून काहीतरी घ्यावं, त्या गोष्टींचं अनुकरण करावं असं काही त्यात असू शकतं. आत्मचरित्र लिहिण्याचा आणि वाचण्याचा उद्देश काय असतो? तर त्या व्यक्तीच्या जीवनातील चांगल्या गोष्टींचा आदर्श वाचकांच्या समोर ठेवावा. आणि हा उद्देश अण्णांच्या आत्मचरित्राने नक्कीच पूर्ण होतो. त्यांची जिद्द, यश मिळवण्यासाठी केलेली धडपड, शॉर्टहॅंड, टायपिंग शिकण्यासाठी केलेली मेहनत, सांसारिक-सामाजिक जबाबदाऱ्या, नोकरी हे सर्व सांभाळून शिक्षण पूर्ण करणं, त्यांचा व्यवस्थितपणा, टिपणं ठेवणं, अनेक वर्ष सातत्याने हिशेब लिहिणं, प्रत्येक गोष्टीच्या फाईल्स बनवणं, ह्या गोष्टी नक्कीच अनुकरणीय आहेत. आपल्या ७० वर्षांच्या आयुष्यात अनेक अनुभवांनी त्यांचे जीवन समृद्ध झाले. प्रत्येकालाच जीवनात कडू-गोड अनुभव येत असतात. परंतु आपण त्याकडे कसे बघतो हे आपल्या दृष्टिकोनावर अवलंबून असते. अण्णांनाही जीवनात कडू अनुभव आले असतील. परंतु कोठेही कोणाबद्दल तक्रारीचा सूर दिसून येत नाही, की कोणावर दोषारोपण नाही. एखाद्या ठिकाणी खंत दिसून येते (सोसायटी करण्याच्या कामात पुढाकार घेऊनही इतर सभासदांनी दाखविलेली अनास्था) परंतु ते अत्यंत स्वाभाविक आहे.

एकत्र कुटुंबात राहिल्यामुळे इतरांना आपल्याबरोबर घेऊन जाण्याची वृत्ती त्यांच्यात आहे आणि त्याचाच उपयोग त्यांना सामाजिक कार्यात होत आहे.

'विद्याप्रसारक मंडळ' ही संस्था आता खूपच नावरूपाला आली आहे. आज ठाणे शहरात या संस्थेला मान आहे. संस्थेचा शैक्षणिक पसारा खूप मोठा आहे. अशा संस्थेचे कार्याध्यक्षपद श्रीयुत करंदीकरांना लाभलं आहे अर्थात अनेक वर्ष ह्या संस्थेसाठी एखादा सामान्य कार्यकर्त्याच्या भूमिकेतून काम केल्यामुळेच हे पद त्यांच्याकडे चालून आलं आहे. त्यांची परिश्रम करण्याची तयारी, तळमळीने कार्य करणारे सहकारी, डॉ. बेडेकरांसारखे मार्गदर्शक ह्या गोष्टींमुळे त्यांच्या कारकिर्दीत संस्थेची अधिकच भरभराट होईल. त्याचा फायदा हजारो विद्यार्थ्यांना होईल.

(पान क्र. ३४ वर)

# 'तयाचा वेलू गेला गगनावरी'

सौ. मैत्रेयी शेवडे

'तयाचा वेलू गेला गगनावरी' संत ज्ञानेश्वरांच्या अभंगातील ह्या पंक्ती प्रस्तुत पुस्तकाचे शीर्षक म्हणून किती सार्थ आहेत ह्याचा प्रत्यय हे पुस्तक वाचल्यावर येतो.

१ ऑगस्ट १९३५ ला अत्यंत विकट अशा आर्थिक परिस्थितीत विद्याप्रसारक मंडळाची स्थापना झाली आणि हे इवलेसे रोप बघता बघता ६० वर्षात आकाशाला गवसणी घालू पाहत आहे. एवढे उत्तुंग यश हे काही थोड्या दिवसात निश्चित मिळत नाही किंवा नुसत्याच वर्षांच्या वाढत्या संख्येनेही मिळत नाही, तर त्यासाठी सर्वस्वाने कार्यासाठी झोकून घेणाऱ्या कार्यकर्त्यांची गरज असते. विद्याप्रसारक मंडळाला प्रथमपासूनच असे तळमळीचे कार्यकर्ते लाभले. ७ एप्रिल १९३२ रोजी ५ मुले जमवून श्री. घाणेकरांनी शाळा सुरू केली आणि अनेक अडचणींचे डोंगर पार करत आज या इवल्याशा रोपाचे-मराठी, इंग्रजी, प्राथमिक, माध्यमिक; कला, वाणिज्य, विज्ञान, विधि महाविद्यालये, तंत्रनिकेतन, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अशा विशाल वटवृक्षात रूपांतर झालेले दिसून येते.

६१ वर्षांच्या इतिहास लिहून काढणे ही काही सोपी गोष्ट नाही. परंतु इतिहास समितीतील प्रा. मोहन पाठक, श्री. दिलीप जोशी व कार्यवाह श्री. अचलकुमार टिल्लू यांनी अथक परिश्रमाने ही अवघड कामगिरी पूर्णत्वास नेली. त्यासाठी इतक्या वर्षांपूर्वीच्या नोंदी तपासणे, संबंधित व्यक्ती, उपलब्ध कागदपत्रे, ठाण्यातील साप्ताहिकांतून चिकाटीने माहिती मिळवून त्याचे योग्य संकलन केले गेले.

या लेखनात मंडळाची झालेली वाढ, मंडळावर आलेली संकटे व त्यांवर केलेली मात, कार्यकारी मंडळाच्या सर्वच सभासदांचा सहकार, डॉ. वा. ना. बेडेकरांसारखे दानशूर, शिक्षणाची तळमळ असणारे खंबीर नेतृत्व इ. गोष्टी दिसून येतात.

वेळोवेळी दिलेला मंडळाच्या सभांच्या खर्चाचा तपशील हा मंडळाच्या चोख पारदर्शी कामगिरीचा पुरावाच आहे.

विद्या प्रसारक मंडळाच्या शाळेतील शिक्षक असूनही, मंडळाच्या कार्याचा, सभासदांच्या नि:स्वार्थ योगदानाचा आम्हाला पूर्णपणे परिचय नव्हता. ह्या पुस्तकाच्या रूपाने तो झाला. पुढील पिढीच्या माहितीसाठी या लेखनाचा मंडळाच्या इतिहासाचा फार मोठा उपयोग होऊ शकेल.

विद्याप्रसारक मंडळाची पुण्याईच एवढी आहे की त्याला तळमळीच्या कार्यकर्त्यांची कधीच वाण पडली नाही आणि ह्या जगन्नाथाचा रथ समर्थ हातांनी ओढला जाऊन पुढे पुढेच जाणार आहे. गगनावर गेलेल्या ह्या वेलाला अनेक शैक्षणिक फांद्या फुटल्या आहेत. त्याचा विस्तार असाच वाढत राहो. अनेक विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळो.

• • •

(पान क्र. ३३ वरून)

**'माझा मीच घडलो' - श्री. श्रीपाद करंदीकर**

आत्मकथनाला जोड म्हणून आलेले भावतरंगही अण्णांचे अनेक गुण उलगडून दाखवतात. नोकरीच्या ठिकाणी असणारी निष्ठा, सचोटी, त्यांच्या अधिकाऱ्यांचा त्यांच्या कार्यकुशलतेवर असलेला विश्वास, त्यांच्या सहकाऱ्यांना त्यांच्याबद्दल वाटणारं आपलेपण, आनंदी वृत्ती, ह्या सर्वांतून स्वत:ला सामान्य म्हणणाऱ्या अण्णांचं असामान्यत्व दिसून येतं. त्यांच्या आत्मचरित्रातील मला सर्वात भावलेली गोष्ट म्हणजे त्यांचा प्रांजळपणा. खऱ्या आत्मचरित्राचा, प्रांजळपणा हा स्थायीभाव आहे आणि त्या कसोटीलाही हे आत्मचरित्र पूर्ण उतरलं आहे

शेवटी श्रीयुत करंदीकरांच्या कार्यकुशलतेने संस्थेची भरभराट होवो आणि त्यांनाही आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य लाभो ही सदिच्छा.

• • •

# केशव पाटणकरची मुलाखत

**रवींद्र मांजरेकर**

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात काही असे प्रसंग येतात की जे त्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत आमूलाग्र बदल घडवून आणतात - त्याचबरोबर अनेकदा ते प्रसंग जडणघडणीस योग्य दिशा दाखवून देतात.

अलिकडचे युग हे स्पर्धेचे युग आहे. प्रत्येक क्षेत्रात अनिर्बंध स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेच्या युगातच बहुसंख्य तरुण हे चाकोरीबद्ध जीवनाची कास धरत असतात. काही जण स्वत:च्या वाटा स्वत:च निर्माण करणारेही आहेत. अशांपैकी एक केशव पाटणकर.

वि. प्र. मं. च्या जोशी-बेडेकर महाविद्यालयात कलाशाखेच्या द्वितीय वर्षाला शिकत असतानाच 'मुक्त पत्रकारितेच्या' क्षेत्रातही त्याने प्रवेश केला आहे. नुकताच त्याचा पहिला वृत्तांत (रिपोर्ट) टाइम्स ऑफ इंडिया च्या 'एज्युकेशन टाइम्स' मध्ये छापून आला. या संदर्भात त्याची भेट घेऊन त्याच्याशी केलेली ही बातचीत.

**प्रश्न:-** 'टाइम्स' मध्ये तुझा वृत्तांत छापून आल्यावर तुला सर्वप्रथम काय वाटले?

**केशव:-** आनंद वाटला आणि खरं तर मला काही वाटण्याआधीच माझं खूप कौतुक झालं, पण तरीही माझ्या मनात संदिग्धताही होती. पहिला रिपोर्ट तर छापून आला. यापुढे काय? तरीही माझ्यासारख्या नवोदिताला 'टाइम्स'ने संधी दिली याचे समाधान आहेच.

**प्रश्न:-** तुला ही संधी कशी मिळाली?

**केशव:-** माझ्या आयुष्यातली ती एक अत्युत्तम घटना होती. मी जरी आर्ट्स कॉलेज मध्ये शिकत असलो तरी आमच्या आवारातील सायन्स कॉलेजच्या लायब्ररीचे ग्रंथपाल श्री. मोहन पाठक सर यांचेकडे माझे सतत जाणे येणे असते. असेच एकदा मी पाठक सरांकडे गेलो असताना श्री. डॉम मोरेस यांचे 'My Son's Father' हे पुस्तक मला दिसले. मी खूप दिवसांपासून या पुस्तकाच्या शोधात होतो. त्यामुळे मी लगेच सरांकडून ते घेऊन संपूर्ण वाचले. वाचत असताना श्री डॉम मोरेस यांना भेटण्याची इच्छा निर्माण झाली. कारण सामान्य माणूस आणि प्रतिभावंत लेखक यांतला एक सुवर्णमध्य त्यांनी त्यांच्या या पुस्तकात साधलेला आहे. त्यामुळे ही व्यक्ती प्रत्यक्षात कशी आहे हे मला पहायचे होते. मी थोडी खटपट करून त्यांचा पत्ता, फोन नंबर मिळवला आणि त्यांची अपॉइंटमेंट घेऊन त्यांना भेटलो. त्यांच्याशी बोललो. त्यावेळी माझ्या मनात मुक्त पत्रकारितेचेही विचार होतेच. व ते स्वत:ही मुक्त पत्रकार आहेत हे मला माहीत होते. मग मी याच क्षेत्राविषयी त्यांना मार्गदर्शन करण्याची विनंती केली. तेव्हा ते म्हणाले. 'उपजीविकेचे साधन म्हणून आज तरी भारतात मुक्त पत्रकारितेला वाव नाही. पण लिखाण मात्र नियमित करावे. वाचनात विविधता असावी. कारण त्यामुळेच विचारांना परिपक्वता येऊन लिखाण प्रभावी बनते'. माझे काही लिखाण त्यांनी या भेटीतच वाचले. त्यांना ते आवडले, मग त्यांनी टाइम्स मध्ये संपर्क साधण्याची सूचना केली-त्यानुसार मी 'टाइम्स' मध्ये गेलो-आणि सुदैवाने टाइम्सने मला पहिली असाइनमेंट दिली, ती मी केली, आणि ती छापूनही आली. असा हा सारा प्रवास आहे.

**प्रश्न:-** हे सारं त्या पुस्तकामुळे घडलं असंच ना?

**केशव:-** सर्वार्थाने तसे नाही. मला संधी मिळण्याबाबत हे पुस्तकच कारणीभूत ठरले हे जरी खरे असले तरी मुळात मला लेखनाची आवड होतीच, तिला दिशा मिळाली.

**प्रश्न:-** यापुढे या क्षेत्रात काय करायचे आहे?

**केशव:-** अजून निश्चित काही नाही. नुसतेच शब्दांचे इमले बांधण्यात मला रस नाही. 'आधी केले मग सांगितले' या विचारसरणीवर माझा विश्वास आहे. कृती महत्वाची!

**प्रश्न:-** पुस्तकांचा, ग्रंथालयाचा संदर्भ आहे म्हणून-आणखी एक विचारावेसे वाटते

(पान क्र. ४० वर)

# परिसर वार्ता

प्रा. मोहन पाटक



कै. पी. सावळाराम



कै. सावित्रीबाई बेडेकर

ठाणे महाविद्यालय परिसर ज्यांच्या अथक परिश्रमांतून उभा राहिला, ज्यांच्या स्वप्नांना या परिसराचे अस्तित्व जाणवले अशा विद्याप्रसारक मंडळाच्या असंख्य कार्यकर्त्यांतील, हितचिंतक सभासदांतील, दोन जण आम्हाला गेल्या दोन महिन्यांत सोडून गेले. महाविद्यालयात आल्यापासून किंबहुना अगदी लहानपणापासून ज्यांच्या शब्दांचे बोट धरून आमची पिढी वाढली ते जनकवी पी. सावळाराम, विद्याप्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष २१ डिसेंबर ९७ रोजी गेले; आणि ज्यांच्या उदार देणगीतून आमचे वाणिज्य महाविद्यालय उभे राहिले ते आमच्या मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, यांच्या शंभरीच्या घराकडे वाटचाल करणाऱ्या मातोश्री सावित्रीबाई बेडेकर २ जानेवारी ९७ रोजी दिवंगत झाल्या.

या दोघांना अत्यंत भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यासाठी एक शोकसभा २३ जानेवारी रोजी परिसराच्या सभागृहात झाली. या शोकसभेत आमच्या विज्ञान महाविद्यालयातर्फे मी, कला, वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रमुख प्रा. दामोदर मोरे, अरुण जोशी, प्रा. सौ. शुभदा खाडिलकर, विद्याप्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. अ. धो. टिल्लू, कार्याध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर व मा. य. गोखले या सर्वांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कै. सावळाराम यांच्या संबंधातील व्यक्तिगत आठवणींना मी व प्रा. अरुण जोशी यांनी उजाळा दिला, तर प्रा. दामोदर मोरे यांनी कवी म्हणून असणाऱ्या त्यांच्या कर्तृत्वाचा आपल्या भाषणात उल्लेख केला. विद्याप्रसारक मंडळाच्या संदर्भातील या दोघांच्याही आठवणींना श्री. टिल्लू, श्री. करंदीकर, व श्री. गोखले यांनी शब्दरूप दिले. सभेस विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, विद्याप्रसारक मंडळाचे सर्व सभासद, महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दोन मिनिटे स्तब्धता पाळून मृतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. नंतर कार्यक्रमाची सूत्रे सांभाळणारे श्री. टिल्लू यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. जड मनाने गंभीर अशा वातावरणात झालेल्या या शोकसभेतील क्षण न् क्षण या थोर व्यक्तिमत्वांच्या आठवणींनी भारलेला होता.

### बांदोडकर महाविद्यालय


डिसेंबर मध्ये झालेल्या इंद्रधनु उत्सवानंतर आमच्या विज्ञान महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ सोळा जानेवारी रोजी संपन्न झाला. ठाण्याचे पोलिस आयुक्त श्री. ओमप्रकाश बाली याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वा. ना. बेडेकर होते.

थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झालेल्या या समारंभाच्या सुरुवातीस, भूतपूर्व हंगामी पंतप्रधान गुलजारीलाल नंदा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर ऋचा वाकणकर व मीनाक्षी सोमण यांनी ईशस्तवन सादर केले. प्राचार्य सी. जी. पाटील यांनी व विद्यार्थी प्रतिनिधींनी व्यासपीठावरील सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. पाटील सरांनी श्री. बाली यांचा परिचय करून दिला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सी. म. सारंग यांनी मुंबई विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. नरेशचंद्र, महाविद्यालयाचे

माजी प्राचार्य शं. कु. आपटे व प्राचार्य सी.जी. पाटील यांनी गेल्या शैक्षणिक वर्षामधील शिक्षण, शिक्षणेतर घडामोडींचा अहवाल सादर करून विद्यार्थ्यांच्या चौफेर प्रगतीची माहिती उपस्थितांना करून दिली.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना श्री. ओमप्रकाश बाली म्हणाले, ''जपानसारख्या छोट्या राष्ट्राने देशभक्ती व राष्ट्रप्रेम यांच्या भावनेवर आपला विकास घडवून आणला. आपल्या देशात मात्र सर्वत्र मूल्यांचा ऱ्हास चालू आहे. आपल्याकडे काम करण्याच्या इच्छेचाच अभाव आहे. शाळा, महाविद्यालये या दृष्टीने आपल्या विद्यार्थ्यांत ही प्रेरणा निर्माण करू शकतात असा माझा विश्वास आहे.'' समारोपाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. वा. ना. बेडेकर यांनी नागरिकांना जागरूकतेची कशी गरज आहे हे सांगितले.

यानंतर कला, क्रीडा व अभ्यास क्षेत्रातील विविध पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी अभ्यासाकरिता असणारी बक्षिसे वाचून दाखविली. कला मंडळ व संयुजा वार्षिक समितीचे प्रमुख प्रा विनायक बुरकुले यांनी अभ्यासेतर क्षेत्रांमधील तर संख्याशास्त्र विभाग प्रमुख व जिमखाना समितीचे प्रमुख प्रा. अशोक पाटील यांनी क्रीडा क्षेत्रातील पारितोषिके वाचून दाखविली.



अमित भरम



सीमा बोराडे

विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत सहावी येणारी संख्याशास्त्राची विद्यार्थिनी कु. मनाली वाघ, जिम्नॅस्टिक्स-मध्ये नैपुण्य मिळवणारा अमित भरम, कराटे या खेळात पारंगतता दाखविणारी सीमा बोराडे, छात्रसेनेमधील मंदार दीक्षित, कला क्षेत्रातील अपर्णा बाफलेकर इ. विद्यार्थ्यांचे यश विशेष उल्लेखनीय होते.

कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित यांनी ऋणनिर्देश केले. स्वागतसमितीचे प्रमुख प्रा. स. ग. मेंढेकर, डॉ. सौ. पेजावर, प्रा. विनायक बुरकुले व इतर प्राध्यापकांनी, तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी समारंभासाठी विशेष कष्ट घेतले. प्राचार्य सी. जी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले होते. प्रा. सौ. उषा तांबे यांनी सूत्रसंचालन केले.

सदर समारंभास विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर, कार्यवाह श्री. अ. धो. टिळ्ळू, मंडळाचे इतर कार्यकारिणी सदस्य तसेच पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कला वाणिज्य महाविद्यालयाचे पारितोषिक वितरण

कला वाणिज्य महाविद्यालयाच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी प्रसिद्ध क्रीडा समीक्षक द्वारकानाथ संझगिरी उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्षस्थान डॉ. वा. ना. बेडेकर यांनी भूषविले.

समारंभाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. डॉ. ए. व्ही. धोपेश्वरकर यांनी स्वागतपर भाषण केले. यानंतर व्यासपीठावरील सर्वांचे पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ए. एस. बडगुजर यांनी अतिशय शैलीदारपणे प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्राचार्य स. वा. गोखले यांनी महाविद्यालयाच्या गेल्या शैक्षणिक वर्षातील घडामोडींचा तपशीलवार अहवाल सादर केला. महाविद्यालयाच्या दुसऱ्या उपप्राचार्य व जिमखाना समितीच्या प्रमुख प्रा. शोभा जोशी यांनी क्रीडा क्षेत्रातील घडामोडींचा अहवाल सादर केला.

श्री. द्वारकनाथ संझगिरी यावेळी बोलताना म्हणाले, ''गेल्या २०-२२ वर्षांत एकूणच क्रीडा क्षेत्राकडे पाहण्याचा पालकांचा दृष्टिकोन झपाट्याने बदलत आहे. विशेषतः क्रिकेट क्षेत्रात आपल्या मुलाने कर्तृत्व गाजवावे असे आईवडलांना फार वाटत असते. परंतु बेटिंगच्या वाढत्या प्रमाणामुळे क्रिकेटपटू आपली विश्वासार्हता गमावून बसत

आहेत हे चांगले चिन्ह नाही. भ्रष्टाचार सर्वच क्षेत्रात वाढत चालला आहे.



दीपप्रज्वलन करताना डॉ. वा. ना. बेडेकर

यानंतर विविध क्षेत्रांत नैपुण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. समारंभात विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. वि. करंदीकर, कार्यवाह श्री. अ. धो. टिल्लू, अन्य सदस्य प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या अध्यक्षीय भाषणाने समारोप झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागाच्या प्रा. कविता पीटर यांनी केले. प्राचार्य स. वा. गोखले यांचे मार्गदर्शन आयोजनास लाभले होते.

### पुन्हा एकदा गणेश

कला वाणिज्य महाविद्यालयाच्या गणेश खराडेने आपल्या चौफेर प्रगतीची वाटचाल दमदारपणे चालू ठेवली आहे. या गुणी विद्यार्थ्याला महाडच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. एकूण ३४ स्पर्धक महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणांहून आले होते. या स्पर्धेसाठी विषय होता,'' २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावरील भारतापुढील आव्हाने.''

### तंत्रनिकेतनातील सांस्कृतिक क्षण




प्रा. प्रवीण दवणे : दिलखुलास गप्पा

तंत्रनिकेतनात ३१ डिसेंबर, दोन व तीन जानेवारी रोजी सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. यात दि. ३१ रोजी प्रसिद्ध कवी, गीतकार, प्रा. प्रवीण दवणे यांच्या दिलखुलास गप्पांच्या कार्यक्रमाचा समावेश होता. विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध करीत प्रा. दवणे यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत मारलेल्या गप्पा अनेक दिवस मनात रेंगाळत राहणाऱ्या ठरल्या. यानंतर विद्यार्थिविश्वातील सध्या लोकप्रिय असणाऱ्या साडी क्वीन व टाय किंग या स्पर्धा झाल्या यात ८० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. सूत्रबद्ध पद्धतीने सादर करण्यात आलेला या कार्यक्रमासाठी विद्यासागर कुलकर्णी, अनया जोशी, सुजाता कुन्हाडे, मनोज सिंग या विद्यार्थ्यांनी विशेष कष्ट घेतले. या स्पर्धेत राजश्री देव ही साडी क्वीन ठरली तर निशांत मल्ल्या हा टाय किंग म्हणून निवडला गेला. मनीष सुळे उपविजेता ठरला.

यानंतर विद्यार्थ्यांमध्ये प्रिय असणारा आणखी एक कार्यक्रम म्हणजे अंताक्षरी हा संपन्न झाला. यात सहभागी झालेले एकूण २७ गट होते. जुन्यानव्या गाण्यांच्या या भेंड्या खूपच रंगल्या. मोहित गोखले, श्वेता हळदणकर, अमीष देवळेकर, मिहीर पटेल, स्नेहा मराठे यांनी हा




प्राध्यापक व विद्यार्थी - चुरशीचा एक क्षण

कार्यक्रम सादर केला. एकूण ९ गट अंतिम फेरीसाठी निवडले गेले. या ९ गटांची अंतिम फेरी २ जानेवारी रोजी सकाळी झाली. त्यातून निवडलेल्या तीन गटांत पुन्हा एकदा चुरस लावण्यात आली. अतिशय दर्जेदार असे प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात आले. विजेतेपदाचे मानकरी ठरलेले विद्यार्थी होते विजया जाधव, ऋचा कोन्हाळे, अंजली सावंत, अनुप जोशी, प्रीती पाटील, अमित बार्शीकर. या गटाची नंतर प्राध्यापकांच्या गटाशी स्पर्धा घेण्यात आली. त्या स्पर्धेतही त्यांना विजेतेपद मिळाले.

यानंतर गीत, संगीत, नृत्य, नाट्य असे विविध कार्यक्रम, स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाल्या. दि. ३ जानेवारी रोजी आनंदमेळ्याचे आयोजन केले गेले. विविध खेळ, खाद्य पदार्थ यांचा आस्वाद घेण्याची ही संधी होती. या स्नेहसंमेलनातील विजेत्या विद्यार्थ्यांना प्राचार्य मुजुमदार यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. विद्यार्थिप्रतिनिधी (जी. एस.) मोहित गोखले याला उत्कृष्ट कामगिरीसाठी विशेष पारितोषिक देण्यात आले. या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सांस्कृतिक मंडळाच्या प्रमुख प्रा. सौ. जी. एस. इंगवले, सौ. उषा राघवन, सौ. आगाशे, सौ. गुप्ते, सौ. शुक्ल, सौ. व. अ. जोशी, श्री. तुळपुळे, सौ. गोडबोले आदींनी विशेष कष्ट घेतले. तर प्रा. विद्याधर वालावलकर, सौ. लौळ, सौ. कुलकर्णी, सौ. बर्डे, कु. राणे यांनी विविध स्पर्धांचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

या सर्व कार्यक्रमांना प्राचार्य सी. श्री. मुजुमदार व उपप्राचार्य डी. के. नायक यांचे मार्गदर्शन लाभले होते.

### तंत्रनिकेतनातील क्रीडास्पर्धा

२६ डिसेंबर ते २ जानेवारी या दरम्यान झालेल्या क्रीडास्पर्धांना विद्यार्थ्यांनी दिलेला प्रतिसाद उत्तम होता. कबड्डी, क्रिकेट, टेबलटेनिस, कॅरम, बुद्धिबळ अशा विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या या सर्व स्पर्धांत २०० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. दि. ३ रोजी झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात प्राचार्य मुजुमदार सर व उपप्राचार्य नायक सर यांच्या हस्ते विजेत्या क्रीडापटूंना पारितोषिके देण्यात आली. क्रीडासमिती प्रमुख प्रा. तुषार विलासराव मोहितेपाटील व त्यांच्या समितिसदस्यांनी क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशेष कष्ट घेतले.

### प्रजासत्ताकदिन

प्रतिवर्षाप्रमाणे २६ जानेवारी रोजी महाविद्यालय परिसरात डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. या प्रसंगी राष्ट्रीय छात्र सेनेच्या भूदल व वायुदलातील विद्यार्थिविद्यार्थिनींनी सलामी दिली. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते पदके देण्यात आली. डॉ. बेडेकरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



क्रीडा समिती

या प्रसंगी आजी व माजी विद्यार्थी, छात्रसेनेतील विद्यार्थी, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. छात्रसेनेतील विद्यार्थ्यांनी यावेळी सांस्कृतिक व युद्धविषयक कार्यक्रम सादर केले. पथनाट्य, कराटेची प्रात्यक्षिके ही सर्वांना खिळवून ठेवणारी होती. विशेषत: मनगटाने, डोक्याने विटा, कौल फोडणे, जळती कौले फोडणे इ. प्रकार थरारक होते. कराटेची प्रात्यक्षिके ५ विद्यार्थ्यांनी सादर केली, तर स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त सादर झालेल्या पथनाट्यात १६ विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच खऱ्या छोट्या युद्धाची बंदूकीसह प्रात्यक्षिके व बॉम्बचा वापरही चित्तथरारक होता.



NCC विद्यार्थ्यांसमवेत सेकंड लेफ्टनंट प्रा. मोझेस कोलेट

या सर्व कार्यक्रमांसाठी परेड कमांडर मंदार दीक्षित, गार्ड कमांडर पूर्णिमा पै व निलेश देवस्थळी, राजेश अवघडे आदी विद्यार्थ्यांनी विशेष कष्ट घेतले.

• • •

(पान क्र. ३५ वरून)

**केशव पाटणकरची मुलाखत**

- 'ग्रंथपालाची विद्यार्थिजीवनातली भूमिका काय असावी? असे तुला वाटते?

**केशव:-** विद्यार्थि सहजरीत्या ग्रंथपालाशी संपर्क साधत नाहीत. तेव्हा ग्रंथपालांनीच दोन पावले पुढे येऊन विविध उपक्रमांच्या माध्यमांतून विद्यार्थ्यांशी संपर्क साधावा जेणेकरून विद्यार्थ्यांशी संवाद होऊ शकेल. 'ग्रंथ हेच गुरू' आहेत, तेव्हा ग्रंथालयासारखी पवित्र जागा ही ज्ञानादि.वाय अनुभवांचे विश्वही समृद्ध करणारी असावी-त्याकरता आधुनिक माध्यमांचा वापर केला जावा-संगणक, इंटरनेट इ. व्यक्तिमत्त्व विकासातली कॉलेज ही महत्वाची पायरी आहे आणि महाविद्यालयीन ग्रंथालय हा या पायरीवरचा महत्वाचा टप्पा आहे. त्यामुळे ग्रंथालयाची भूमिका ही विद्यार्थिजीवन समृद्ध करणारी असावी.

**प्रश्न:-** यापुढचे तुझे काय प्लॅन्स आहेत?

**केशव:-** स्पष्टच सांगायचे तर मी आजतागायत कोणतीही गोष्ट 'प्लॅन' करून केलेली नाही. आखीव चाकोरीबद्ध जीवन ही संकल्पनाच मुळात मला मान्य नाही. कारण मी असे मानतो की Life is mystery to be lived, and not a problem to be solved. तेव्हा याहीपुढे परिस्थितिसापेक्षच निर्णय घेईन.

ही मुलाखत घेण्यामागे दोन उद्देश होते. एक तर केशवचे अभिनंदन करावे, व 'ग्रंथ ग्रंथपाल' यांच्या भूमिकेचा तरुण पिढी कशा प्रकारे विचार करते याचे प्रातिनिधिक स्वरूपही पुढे यावे.

एका पुस्तकाने केशवला दिशा दिली. तशीच दिशा इतरांनाही मिळावी म्हणून मुलाखतीचा हा प्रपंच-

केशवला त्याच्या पुढच्या वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

• • •

झाले. बोस यांनी मात्र १९१७ साली सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर संशोधनाला वाहिलेली बोस रिसर्च इन्स्टिट्यूट कलकत्ता येथे काढली. मार्कोनी हे जडवादी, औद्योगीक पाश्चिमात्य संस्कृतीचे तर बोस हे वैश्विक, आध्यात्मिक पूर्वेकडील संस्कृतीचे प्रतिनिधी होते. बोस यांनी विपुल संशोधन केले. त्यांच्या संशोधनाची किंमत त्यांच्या मित्रांना कळत होती. पण बोसमात्र या संशोधनाचा व्यापार किंवा स्वामित्व घेण्यास तयार नव्हते. मार्गरेट नोबल (म्हणजेच भगिनी निवेदिता) आणि सौ. सारा बुल यांनी स्वत: प्रयत्न करून शेवटी बोस यांच्या नावाने अमेरिकेत एक पेटंट विकत घेतले. १९१७ साली बोस यांना 'नाईटहूड' मिळाली आणि १९२० साली इंग्लंडच्या रॉयल सोसायटीचे अतिशय मानाचे सभासदत्व त्यांना बहाल करण्यात आले. या निमित्त बोलावलेल्या विद्वज्जनांच्या सभेमध्ये पिपी. सी. रॉय यांनी स्पष्टपणे सांगितले की आपल्या संशोधनाकरिता श्री. बोस यांनी स्वामित्व घेतले असते तर लाखो रुपये मिळवले असते. बोस यांचे एक मित्र पॅट्रिक गेडस् (Patrick Geddes) यांनी १९२० साली 'The Life and Works of Sir Jagdish C Bose' हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकामध्येही त्यांनी बोस यांच्या स्वामित्व न घेण्याच्या प्रवृत्तीबद्दल लिहून बोस यांची प्रवृत्ती आणि जीवनाचा दृष्टिकोन हा प्राचीन भारतीय ऋषींसारखा होता असे नोंदवून ठेवले आहे.

बोस यांचा स्वामित्वाबद्दलचा स्वत:चा दृष्टिकोन काहीही असला तरी इतिहासाने त्यांनी केलेल्या संशोधनाची नोंद योग्य रीतीने घेऊन त्यांना योग्य ते श्रेय देणे आवश्यक आहे. मार्कोनी यांचे विज्ञानाचे योगदानही मोठे आहे. हा वाद बोस की मार्कोनी असा नसून ऐतिहासिक क्रमाची सत्य नोंद आणि न्याय्य श्रेय या संबंधीचा आहे. अमेरिकेतील इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड इलेक्ट्रिकल इंजिनिअर्स (Institute of Electronics and Electrical Engineers, IEEE) या संस्थेच्या अभ्यास गटाने बिनतारी संदेशवहनाचे जनक मार्कोनी नसून बोस असल्याचे सप्रमाण दाखवून दिले आहे. प्रसिद्ध विज्ञान शोधपत्र 'सायन्स' (Science) च्या २३ जाने. १९९८ च्या अंकामध्ये (Page 476, VOL. 279) याची माहिती देणारा लेख प्रकाशित झाला आहे. भारतीय वैज्ञानिक आणि शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यास क्रमातील पुस्तके, याची नोंद घेऊन योग्य तो बदल करतील अशी अपेक्षा आहे.

• • •


विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

**थोरले बाजीराव पेशवे सभागृह**

३०० आसने, आधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा उपलब्ध,

प्रसन्न नैसर्गिक वातावरण, उपहाराची व्यवस्था

संपर्क

कार्यवाह, विद्याप्रसारक मंडळ, ठाणे.

दूरध्वनी : ५४२ ६२७०